## प्रकरण दुसरे

## श्री रत्नाप्पा कुंभार व प्रजापरिषाद

## प्रकरण दुसरे

### श्री रत्नाप्पा कुंभार व प्रजापरिषद

रत्नाप्पा कुंभार यांच्या आयुष्यातील सर्वांत महत्वाचा व वैभवशाली कालखंड म्हणजे त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत केलेले कार्य होय.

कोल्हापूरच्या संस्थानी जनतेला दरबारच्या अनेक अत्याचारांना तोंड द्यावे लागत होते. या अन्यायाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले होते. त्या बरोबर प्रजेच्या असंतोषात भर पडत होती. या संस्थानी जनतेला नागरी स्वातंत्र्य मिळावे यासाठी सभाबंदी, आणि मुद्रण बंदी उठवावी म्हणून अनेक वेळा नागरिकांच्या सह्यांची निवेदने दरबारकडे पाठवली. शिष्ठ मंडळे पाठवून दरबारशी चर्चा करण्याचा प्रयत्न केला. परंतु दिवाण सुर्वे यांच्याकडून फारसा प्रतिसाद मिळाला नाही म्हणजेच सनदशीर मार्गाने, अर्ज विनंत्या करून दरबारकडून प्रजेला नागरी स्वातंत्र्य मिळणार नाही याची जाणिव झाल्यानंतर कोल्हापूरच्या संस्थानी जनतेत राजकीय जागृती करण्यास भाई माधवराव बागल आणि रत्नाप्पा कुंभार यांनी सुरुवात केली.[१]

### शेतकऱ्यांचा पहिला मोर्चा --

कोल्हापूर संस्थानात शिरोळ पेट्यामध्ये चळवळीचे वातावरण विशेष होते. शिरोळ येथील दिनकरराव देसाई, तात्या देसाई व दत्तोपंत देशिंगकर या शेतकरी नेत्यां बरोबर भाई माधवराव बागल व रत्नाप्पा कुंभार यांच्यामध्ये वैचारिक बैठक डिसेंबर १९३८ मध्ये होऊन छत्रपतींकडे नागरी स्वातंत्र्याची मागणी

करणारे व डोईजड शेतसारा कमी करण्यासाठी निवेदन पाठवण्याचे ठरविले. या बैठकीस दरबारने प्रत्युत्तर देऊनन अनेक कार्यकर्त्यांची धरपकड करनन तुरुंगात टाकले व सार्वजनिक शांततेस धोका निर्माण केला असा त्यांच्यावर आरोप ठेवला. रत्नाप्पा कुंभारांनी कोल्हापूर सोडून मिरजेला प्रयाण केल्यामुळे ते बाहेर राहिले.[२]

शिरोळ मधील धरपकडीमुळे शेतकरी जास्त खवळले व त्यांनी संस्थानिकां-विरुध्द उठावाचे शिंग फुंकले व खेडोपाडी जाऊनन जनजागृतीचा जागर मांडला. जनतेच्या मनात विश्वास निर्माण केला. दरम्यानच्या काळात रत्नाप्पा कुंभार यांनी आपल्या प्रचाराची घोडदौड खेडोपाडी पसरवली. ता.१ डिसेंबर १९३८ ते २५ डिसेंबर १९३८ या १५ दिवसात सीमा- भाग पिंजून काढला व शेतकऱ्यांचा मोर्चा काढण्याची तयारी केली.[३]

जनतेत निर्माण झालेला उत्साह कमी करण्यासाठी दरबारने दडपशाहीस सुरुवात केली व जनतेत दहशत बसविण्यासाठी दरबारने हत्यारी पोलिस पार्टीचे पहारे कृष्णेच्या तीरावर कोल्हापूरच्या सरहद्दीवर बसवले. इतकेच नव्हे तर १५ डिसेंबर ते २५ डिसेंबर १९३८ या दहा दिवसात रात्रंदिवस पहाऱ्याचे मदतीस घोडदळही देण्यात आले होते.[४]

संस्थानात भाषण बंदी असल्याने लोकांचा उत्साह अधिक वाढला. शिरोळ पेट्याच्या शेतकऱ्यांनी मिरजेच्या घाटावर सभा घेण्याचे ठरवले. परंतु मिरज दरबारने बंदी केली. खालसा मुलखाची सरहद्द जवळच २ ते ३ मैलावर लागत होती. त्या हद्दीतील सातारा जिल्ह्यातील धामणी गावच्या शेतवडीत १४ नोव्हेंबर १९३८ रोजी भाई माधवराव बागल, दिनकरराव देसाई, नानासाहेब जगदाळे, रत्नाप्पा कुंभार, राका मिणचे या पुढाऱ्यांनी सभा घेऊनन लोकांच्या दुःखाला वाचा फोडली.[५]

तात्यासाहेब शिखरे यांच्या अध्यक्षतेखाली सभेस सुरुवात झाली. भाई माधवराव बागलांनी लोकांना एकीचे महत्त्व पटवून दिले.तसेच सभाबंदीचे तोटे दाखवून दिले. सभाबंदी उठवा, शेतसारा कमी करा यासारख्या मागण्या एकत्रित करनन संघटितपणे सरकारकडे मागणी करण्याचे सभेत निश्चित केले.

संघर्ष करत असताना भविष्यकाळात येणाऱ्या संकटाची जाणीव करून दिली. कारण कदाचित कोणाच्या जमिनी सरकार जमा होण्याची शक्यता होती. काहीची घरे दारे जप्त होण्याची चिन्हे दिसत होती. तर काहींना तुरुंगवास भोगावा लागणार होता. कोणत्याही प्रसंगाला आपण डगमगणार नाही अशा अर्थाच्या शपथा कृष्णामाईला व उभ्या पिकाला साक्षी ठेवून त्यांच्याकडून घेतल्या व अशा प्रकारे भावी चळवळीचा पाया या सभेत घातला गेला.[६]

कोल्हापूर संस्थानात सर्वत्र दडपशाही सुरु होती. शेतकरी मोर्चा येऊ न देण्याची तयारी दरबारने काटेकोरपणे सुरु केली होती. पण दरबारच्या दुर्दैवाने व ब्रिटिशांच्या कुट नितीमुळे मिरज कोल्हापूर हा रेल्वे रस्ता व कोल्हापूर स्टेशन दरबारच्या ताब्यात नव्हते त्यामुळे कोल्हापूरच्या स्टेशनवर मोर्च्याने एकत्र येऊन बैठक मारण्याचे ठरविले. चळवळीला हा एक फायदाच झाला. रत्नाप्पा कुंभारांनी खास योजना करून हुबळीच्या रेल्वे ट्रॅफिक सुपरिंटेंडेंटकडे खास गाडीची मागणी केली व त्यासाठी १६ डबे मुक्रर केले व त्याचे भाडे रु. २,०००-०० रोख भरले, त्यामुळे मिरजेतील शेतकरी व वाटेतील खेडोपाड्यातील शेतकरी या खास रेल्वेने जयघोषाचे निनाद घुमवत ध्वजासह निघाले होते.[७] २५ डिसेंबर १९३८ रोजी माधवराव बागलांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा आगला. या मोर्च्याने पुढील मागण्या मांडल्या --

१) डोईजड शेतसारा कमी व्हावा,

२) संपूर्ण नागरिक हक्क, स्वातंत्र्य मिळावे,

३) जबाबदार राज्यपध्दती मिळावी.[८]

हा मोर्चा कोल्हापूरात आल्यानंतर भाई माधवराव बागल स्टेशन बाहेर पडताच त्यांना अटक झाली व पुढे नानासाहेब जगदाळे यांनी नेतृत्व स्वीकारले. दिवाण सुर्वे यांनी मागण्यांचा योग्य विचार १५ दिवसात करण्याचे आश्वासन दिले, त्यामुळे मोर्चा विसर्जित करण्यात आला. पुढे १० दिवसाचे अंतराने कोल्हापूर दरबारने ५ जानेवारी १९३९ रोजी जाहिरनामा काढला परंतु त्याने कोणाचे समाधान झाले नाही.[९]

शेतकऱ्यांचा दुसरा मोर्चा --

कोल्हापूर दरबारने दिलेले वचन पाळले नाही, त्यामुळे संस्थानात सभा भरू लागल्या आणि दुसऱ्या मोर्च्याची तयारी केली. शेतकऱ्यांचा दुसरा मोर्चा येऊ नये म्हणून कोल्हापूर दरबारने नेत्यांना अटक करणे, रस्ते आडवणे, शेतकऱ्यांची नाकेबंदी करणे या मार्गाने अटकाव करण्याचा प्रयत्न केला परंतु त्याला न जुमानता १५ जानेवारी १९३९ रोजी स्पेशल ट्रेनने हजारो शेतकरी मोर्च्यात दाखल झाले.[१०] स्टेशनची हद्द ही ब्रिटिश सरकारची असल्याने स्टेशनच्या आवारा बाहेर पोलिस व लष्करी शिपायांचा बंदोबस्त ठेवण्यात आला. तरीही ४००० शेतकरी शांतपणे आवारा बाहेर पडून रस्त्याच्या कडेला बसून राहिले. कोणताही प्रक्षोभ प्रकार होण्यापूर्वी स्वत: छत्रपती राजाराम महाराजांनी मोर्च्याच्या पुढाऱ्यांशी बोलणी करून मोर्च्याचे विसर्जन केले.

भाषण व सभा स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सर्व भागात प्रचार दौरा काढून प्रजापरिषदेच्या संघटनात्मक कार्याच्या दृष्टीने सभा बैठका सुरू केल्या. अशा ह्या जाहिर सभेत भाई माधवराव बागलांचा तुफानी प्रचार सुरू झाला. भाई माधवराव बागल यांचे भाषण होईपर्यन्त रत्नाप्पा कुंभार कार्यकर्त्यांची बैठक घेत असत. बैठकी नंतर पुढील कार्याची दिशा ते सभेच्या शेवटी सांगून जनतेला या सक्रीय कार्यासाठी आवाहन करीत असत. अशा वेळी लोकही या प्रजा संघटनेसाठी जाहिरपणे देणग्या देऊ लागले. रत्नाप्पा कुंभारांनी अत्यंत काटकसरीने निधी जमवून तो वापरला. रायबाग, चिंचली, कटकोळ, तारेगल, खडकलाट, मुरगूड, कागल, गडहिंग्लज, गारगोटी, राधानगरी, पन्हाळा, शाहुवाडी, इचलकरंजी, शिरोळ या ठिकाणी रत्नाप्पा कुंभार व भाई माधवराव बागल यांनी सभा घेतल्या.[११]

२५-१-१९३९ पासून १-२-३९ पर्यन्तच्या कालात अनेक प्रचार सभा घेऊन लोक जागृती घडवून आणली. त्यातून प्रजापरिषदेचा जन्म झाला.[१२]

## प्रजापरिषदेची स्थापना --

संस्थानात कॉंग्रेसची स्थापना करण्यास व चळवळ करण्यास गांधीजींनी अनुमती न दिल्याने कार्यकर्ते अस्वस्थ होते. ६ फेब्रुवारी १९३९ रोजी जयसिंगपूर येथील श्रीराम ऑईल मिलमध्ये प्रजापरिषदेच्या स्थापनेसाठी कार्यकर्त्यांची बैठक आयोजित केली होती. या बैठकीस रत्नाप्पा कुंभार, दिनकरराव देसाई यांच्या सह २००० कार्यकर्ते होते. सभेला सुरुवात होणार इतक्यात राजद्रोहाच्या १२४ अ कलमाखाली पकड वॉरंट आल्याने बागलांना तेथे अटक झाली.[13] त्यानंतर श्री रत्नाप्पा कुंभार , दिनकरराव देसाई या सारख्या नेत्यांनी संघटनेची सुत्रे हाती घेतली.

जनतेने प्रजापरिषदेच्या छत्राखाली भक्कम संघटना उभारली. प्रजापरिषदेच्या स्थापनेपूर्वी काही काळ व नंतर रत्नाप्पा कुंभार यांनी संपूर्ण साह्य केल्याने भाई माधवराव बागल म्हणतात "रत्नाप्पाण्णांचे सहकार्य नसते तर मला संघटना बनवणे शक्य नव्हते, मी स्वभावताच प्रचारक व विचार देणारा, रत्नाप्पा कुशल संघटक अशी आमची जोडी होती म्हणूनच प्रचंड कार्याचा उठाव झाला. आम्ही जीवाभावाने व ध्येयाने जणू एकरुप झालो होतो. रत्नाप्पा सारखा अहर्निश झटून कार्य करणारा दुसरा असा साथीदार व सहकारी नव्हता. मी रान उठवणार, रत्नाप्पा त्याची कष्ट मशागत करणार मी वळवाच्या पावसाप्रमाणे जमिन भिजवणार रत्नाप्पा त्याची नांगरटी करणार यातूनच नव्या विचारांना पालवी फुटली व प्रजापरिषदेचे रोपटे वाढले पण या वाढत्या रोपट्याला खुडून टाकण्याचा कित्येकांनी प्रयत्न केला."[14]

प्रजापरिषदेच्या पहिल्या अधिवेशनाच्या स्वागत मंडळाची सभा २५-२-३९ रोजी जयसिंगपूर येथील ऑईल मिल मध्ये शंकरराव देव यांच्या मार्गदर्शनाखाली घेतली व या बैठकीत भाई माधवराव बागलांच्या अटकेचा निषेध करण्यात आला. दरम्यानच्या काळात कोल्हापूर दरबार आणि

रेसीडेन्सीच्या डोळ्यात सलत असलेल्या "कोल्हापूर संस्थान प्रजापरिषद" या राष्ट्रीय वृत्तीच्या संघटनेवर १९०८ च्या क्रिमिनल लॉ अॅमेन्डमेन्ट अॅक्टच्या कलम १६ खाली दरबारने बंदी हुकूम जारी केला.[१५] दरबारशी एकनिष्ठ असलेल्या व्यक्ती विरुध्द सामाजिक बहिष्कार घालण्यावर बंदी घालण्यात आली. छत्रपती किंवा त्यांचे आदेशा विरुध्द अनादर व्यक्त करणे, आंदोलन व शांतता भंग करणे इ. कारवायाविरुध्द उपाय योजना करण्याचा निर्धार राजपत्राद्वारे व्यक्त करण्यात आला. तसेच प्रजा परिषदेची जागा, निधी, मालमत्ता जप्त करण्यात आली. बेकायदेशीर ठरवलेल्या प्रजापरिषदेच्या सभासदांना शिक्षा ठोठावण्यात आली. कोल्हापूर संस्थान प्रजापरिषदे विरुध्द जादा गॅझेट काढून २५-३-१९३९ रोजी कोल्हापूर दरबारने बेकायदा ठरवली.[१६]

<u>प्रजापरिषदेचे पहिले अधिवेशन --</u>

कोल्हापूर संस्थान प्रजापरिषदेचे अधिवेशन भरवण्याची तयारी मोठ्या प्रमाणावर सुरु झाली. परिषदेच्या प्रचारासाठी कोल्हापूर संस्थानभर अनेक कार्यकर्ते फिरत होते. प्रतिनिधि निवडून देणाऱ्यांची संख्या २५ हजारावर गेली होती. या अधिवेशनाची व्यवस्था करण्यासाठी कोल्हापूरचे कार्यकर्ते श्री सर्वोत्तमराव यांच्या नेतृत्वाखाली १००० स्वयंसेवकांचे पथक तयार करण्यात आले. या परिषदेपुढे सर्व प्रजाजनांच्या गाऱ्हाण्यांना पुढे येण्यास पूर्ण संधी मिळावी यासाठी सर चिटणीस रत्नाप्पा कुंभार यांचा विशेष कटाक्ष होता व ठिकठिकाणच्या कार्यकर्त्यां विषयी प्रसिध्दी पत्रे पाठविली होती.[१७] संस्थानात बंदी असली तरी दरबारच्या दडपशाहीला न डगमगता कोल्हापूर संस्थान प्रजापरिषदेचे पहिले अधिवेशन १५ एप्रिल १९३९ रोजी डॉ. पट्टाभिसितारामय्या यांच्या अध्यक्षतेखाली सांगली शेजारी कुपवाड येथे भरले.[१८] यामध्ये दिनकरराव देसाई स्वागताध्यक्ष, म.दु. श्रेष्ठी उपाध्यक्ष व रत्नाप्पा कुंभार सरचिटणीस होते. या अधिवेशनात एकूण १३ ठराव मंजूर करण्यात आले ते पुढील प्रमाणे ---

१) राजकीय हक्क त्वरित देण्यात यावेत,

२) डोईजड शेतसारा ताबडतोब कमी करण्यात यावा,

३) छत्रपतींचा खाजगी खर्च कमी करावा,

४) छत्रपतींनी शेतकऱ्यांच्या जमिनी सक्तीने काढून घेऊन शिकारीच्या शौकासाठी निर्माण केलेली " पार्कस " उठविण्यात यावीत.

५) जहागिर व प्रजाजनांच्या मागण्या मान्य कराव्यात,

६) प्रजापरिषदेवरील बंदी ताबडतोब उठविण्यात यावी,

७) स्थानिक स्वराज्य संस्था खऱ्या अर्थाने लोकाभिमुख बनविण्यात याव्यात,

८) जबाबदार राज्य पध्दती स्थापन करावी.

वरील प्रमुख ठराव होते. याशिवाय शेरी जमिनिची चौकशी करणे, दडपशाही व मारहाणीची चौकशी करणे, इ. ठराव त्यात मांडण्यात आले.[१९]

प्रजापरिषदेच्या प्रचारास जोम धरलेला होता. कोणत्याही प्रकारच्या दडपशाहीला न जुमानता कार्यकर्ते मिळणाऱ्या शिक्षेस सामोरे जात होते. याच वेळी प्रजापरिषदेला प्रत्युत्तर देणारी प्रतिगामी पुढाऱ्यांची जून १९३९ मध्ये " रयत सभेची " स्थापना झाली. यास दरबारची मदत व प्रेरणा लाभली. बाळासाहेब मोरे यांच्या अध्यक्षतेखाली कोल्हापूरात अधिवेशन घेण्यात आले.[२०]

प्रजापरिषदे तर्फे प्रत्येक तालुक्यातील रि.स.नंबर्स व त्या लगतचे खालसातील रि.स.नंबर्स यांची माहिती देऊन शेतसारा संस्थानी दरबारचा कसा ३३ टक्के जास्त होता हे दाखवून दिले. हे पत्रक विशेष अभ्यास करुन व परिश्रम घेऊन श्री लालजी उपाध्ये व रत्नाप्पा कुंभार यांनी काढले होते. या तुलना पत्रकावर मात्र दरबारने मौन पाळले. ५०० ते ७०० कार्यकर्ते शिबिरार्थी म्हणून सायकलवरुन खेडोपाडी जाऊन पत्रके व प्रचार करुन लोकजागृती करु लागले. दरम्यानच्या काळात रत्नाप्पा कुंभार व बाबूराव

गोखले यांनी "कोल्हापूर संस्थान प्रजापरिषदेचा" अहवाल तयार केला. त्यामध्ये ज्याना शिक्षा व दण्ड झाले आहे त्याची यादी, मारहाणीची यादी, जप्त्याची यादी या अहवालात देऊन परिषदेचा संपूर्ण जमाखर्च ऑडिटसह छापण्यात आला. त्याच्या हजारो प्रती संस्थानात वाटण्यात आल्या. [२१]

श्री रत्नाप्पा कुंभार सत्याग्रह मोहिम सुरु करण्याच्या मनस्थितीत होते. त्यासाठी सत्याग्रहींची नोंदही सुरु होती. परंतु संस्थानी प्रजापरिषदेने या गोष्टीस परवानगी दिली नाही तर ज्यांच्यावर वॉरन्टस आहेत त्यानी आपणाहून कोर्टात जावे व शिक्षा भोगावी अशी घोषणा केली. [२२]

रत्नाप्पा कुंभार व दिनकरराव देसाई, राका मिठारे इ. नेते दरबारच्या वॉरन्टप्रमाणे मिरजेहून कोल्हापूर स्टेशनवर गेले व तेथून कार्यकर्त्यांच्या प्रचंड जयघोषात शनिवारातील डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट शेटे यांचे पुढे जून १९३९ मध्ये हजर झाले. श्री शेटे यांनी वॉरन्टस प्रमाणे १२४ अ व भारत संरक्षण कायद्याखाली उभयंताना पकडल्याचे सांगून पोलिस संरक्षणात बिंदू चौकातील मध्यवर्ति कारागृहात त्यांची रवानगी केली व पुढे राजद्रोहाच्या आरोपाखाली डिसेंबर १९३९ मध्ये रत्नाप्पा कुंभार यांना दोन वर्षांची सक्त मजुरी व रु.५००- दण्डाची शिक्षा झाली. [२३] शिक्षे नंतर दीड महिन्यातच त्यांना पन्हाळा येथिल तुरुंगात पायात बेडया घालून नेण्यात आले. पन्हाळा येथील तुरुंगात भाई बागल, रत्नाप्पा कुंभार, देसाई, गोखले ही सर्व मंडळी असल्याने सर्वांनी विचारपूर्वक तुरुंगाच्याबेशिस्तीवर उपाय करण्याचे ठरवले. त्याप्रमाणे पोलिसां बरोबर रात्रीच्या वेळी गुप्तपणे चर्चा केली. त्यादृष्टीने त्यानी 'विद्याविलासकार' बाबूराव गोखले यांचे बरोबर संपर्क जोडून तुरुंगात व तुरुंगाबाहेर कामाची आखणी केली. राजबंद्यांच्या या २४ तासाचा सहवास सशस्त्र पोलिसांना प्रेरक ठरणारा होता. या पोलिसांची मानसिक तयारी रत्नाप्पा कुंभार यांनी केली. त्याप्रमाणे २४ नोव्हेंबर १९४० रोजी ४०० पोलिसांनी हाती बंदूक घेऊन टाऊन हॉल पासून मोर्चा काढला. त्यांचा

मासिक पगार ७ रु.ऐवजी रु.१७ द्यावा ही त्याची न्याय व वाजवी मागणी होती. परंतु दरबारने या मागणीला प्रथम पासून उत्तर दिले नाही. ३० जवानांना पकडले गेले, १४ जणांना नोकरीवरुन काढून टाकण्यात आले.[२४] केवळ अन्नासाठी व भाकरीसाठी हा पोलिसांचा उपाय होता यास शेवटपर्यन्त रत्नाप्पा कुंभार यांचा पाठिंबा होता परंतु त्यांचे नाव मात्र कोणीही दरबारच्या कानी घातले नाही.

पुढे सशस्त्र पोलिस तुरुंगात असताना २९-११-४० रोजी छत्रपती राजाराम महाराज यांचे अचानक निधन झाले.[२५] त्यामुळे दरबारने व सुर्वे दिवाण यांनी नमते घेऊन सर्वांना बंदमुक्त केले व छत्रपतींच्या अंत्ययात्रेत सामील होण्याचे आवाहन केले व नंतर रु.१७ पगार पोलिसांना मंजूर करण्यात आला व इतर भत्तेही मिळाले. पन्हाळा राजबंदीनिवासात सशस्त्र पोलिस तुकडीने रत्नाप्पा कुंभारांना अभिवादन केले. लवकरच १८ डिसेंबर १९४० ला सर्व राजबंद्यांची सुटका करण्यात आली.[२६] रत्नाप्पा कुंभार, भाई माधवराव बागल, प्रजापरिषदेचे चिटणीस नानासाहेब जगदाळे यांची मुक्तता करण्यात आली. अशावेळी बरेच लोक त्यांचा पुष्पहार अर्पण करुन सत्कार करण्याच्या विचारात होते, परंतु श्रीमंत छत्रपती राजाराम महाराजांच्या निधनामुळे या सर्वांनी कोणत्याही प्रकारचा सन्मान करुन घेण्याचे नाकारले.

जानेवारी १९४१ मध्ये कोल्हापूरच्या कार्यकर्त्यांचे सम्मेलन झाले,यामध्ये प्रजापरिषदेवरील बंदी उठवावी व जबाबदार राज्यपध्दती स्थापन व्हावी अशा मागण्या करण्यात आल्या, परंतु दरबारकडून कोणतेच प्रत्युत्तर आले नाही. ८ मार्च १९४१ रोजी नगरपालिकेची त्रैवार्षिक निवडणूक होणार होती.[२७] अत्यंत पध्दतशीरपणे या निवडणूका लढवावयाच्या व नगरपालिकेत बहुमत मिळवावयाचे व मोठ्या प्रमाणावर शहराची सुधारणा करावयाची या हेतूने १९-२-१९४१ रोजी "करवीर स्थानिक स्वराज्य संघाची" स्थापना झाली.[२८] तिच्यातर्फे श्री माधवराव बागल, गोविंदराव लक्ष्मणराव कोरगांवकर व रत्नाप्पा कुंभार या तिघांचे एक नियंत्रण मंडळ स्थापले गेले.

प्रजापरिषदेवर बंदी असल्याने " करवीर स्थानिक स्वराज्य संघाने " कोल्हापूर नगर पालिकेच्या निवडणूकीमध्ये २५ लोकनियुक्त जागा लढवल्या. त्यातील हरिजनांच्या दोन जागा व ग्रॅज्युएट्स बोर्डाची एक जागा सोडून उरलेल्या २२ जागा संघाच्या उमेदवारांनी जिंकल्या. वरील निर्णयाच्या नियमक मंडळाच्या संघटना चातुर्याने या निवडणूकीत भरघोस यश मिळविले.[२९]

नगरपालिकेच्या निवडणूकीत यश प्राप्त झाल्यानंतर संपूर्ण संस्थानभर रत्नाप्पा कुंभार, भाई माधवराव बागल, यानी लोक जागृतिसाठी दौरे काढले. पुढे १४-११-१९४१ रोजी पद्मराजे नामकरण प्रसंगी प्रजापरिषदेवरील बंदी उठविण्यात आली.[३०] यामुळे प्रजापरिषदेच्या राजकीय कामास वाव मिळाला.

प्रजापरिषदेचे दुसरे अधिवेशन --

प्रजापरिषदेवरील बंदी उठल्यामुळे कार्यकर्त्यांना संघटित करून त्याचा उत्साह द्विगुणीत करण्याच्यादृष्टीने कोल्हापूर येथे प्रजापरिषदेचे दुसरे अभुतपूर्व अधिवेशन श्री बाळासाहेब खेर यांच्या अध्यक्षतेखाली १ व २ जून १९४२ ला झाले. या अधिवेशनास ५० हजारावर अधिक जमाव जमला होता. यावेळी उज्ज्वल व यथायोग्य असे निर्णय घेण्यात आले. श्री खेर या अधिवेशनात म्हणाले की " लहान संस्थाने लगतच्या वारसा मुलखात विलीन करणे अपरिहार्य होय " असे सांगून लोकमतावर घटना बनविण्यासाठी बाळासाहेब खेर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली. यानंतर देशातील चळवळीला तीव्र स्वरुप प्राप्त झाले.

चले जाव चा ठराव --

८ ऑगस्ट १९४२ च्या अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीच्या बैठकीला प्रजापरिषदेचे सरचिटणीस रत्नाप्पा कुंभार, कार्याध्यक्ष भाई माधवराव बागल हजर होते.[३१] ही बैठक क्रांतिकारक ठरली. महात्मा गांधीजींनी " चले जाव " चा ठराव मंजूर करून घेतला. त्यामुळे ताबडतोब थोर पुढाऱ्यांची धरपकड सुरु झाली. त्याचे पडसाद संस्थानातून सुध्दा उठू लागले. कोल्हापूर

संस्थानात भाई माधवराव बागल, म.दु.श्रेष्ठी व रा.तु.बगाडे इ. कार्यकर्त्यांना अटक झाली.

ता.१४ ऑगस्ट १९४२ रोजी कोल्हापूर रविवार वेशीजवळ बंदी हुकूम मोडून जाहिर सभा घेण्यात आली. प्रचंड जनसमुदाय या सर्वात्रिक उठावात आनंदाने सहभागी झाला होता. कोल्हापूर दरबारने त्या स्वातंत्र्योत्सुक जनतेवर लाठीहल्ला केला. पोलिसांनी केलेल्या लाठीहल्ल्यात १६ वर्षांचा तरुण बिंदु नारायण कुलकर्णी हा कोल्हापूरचा स्वातंत्र्य लढ्यातील पहिला बळी पडला. स्वातंत्र्य यज्ञावर त्याची पहिली आहुती पडली. त्याच्या मृतदेहाची प्रचंड मूक मिरवणूक कोल्हापूर शहरात काढण्यात आली. आज त्या चौकाला ' बिंदू चौक ' म्हणतात.[३२]

<u>भूमिगत चळवळ ---</u>

कोल्हापूरात प्रजापरिषदेच्या गुप्त हालचाली चालू होत्या. इचलकरंजी येथे रत्नाप्पा कुंभार सप्टेंबर १९४२ मध्ये गुप्तवासाला आले. इचलकरंजी येथे प्रजापरिषद कार्यकर्त्यांची बैठक १३-९-१९४२ रोजी भरविण्यात आली. त्यामध्ये सत्याग्रह आंदोलन छेडण्याचे ठरले. त्यातून राज्ययंत्रणा खिळखिळी करण्याचे निश्चित केले. दरबारने त्याची दखल दडपशाहीने घेऊन रत्नाप्पा कुंभारांचेवर पकड वॉरन्ट काढले. परन्तु इचलकरंजी जहागिरीत दरबार त्यांना पकडू शकले नाही, मागील धरपकडीचा धडा घेऊन ऑगस्ट आंदोलनात स्वत:ला पकडून न घेता भूमिगत चळवळीचे रणशिंग रत्नाप्पा कुंभारांनी फुंकले.[३३]

कोल्हापूरची चळवळ अखिल भारतीय लढ्याचा एक विभाग म्हणून रत्नाप्पा कुंभार यांच्या नेतृत्वाखाली चालविण्यात आली. याच वेळी प्रजापरिषदेच्या गुप्त हालचाली चालू होत्या, शाळा - कॉलेजीस ओस पडली होती. मिरवणुका सभा सुरु झालेल्या होत्या. अशावेळी रत्नाप्पा कुंभार भूमिगत होते. भूमिगत राहून प्रचार पत्रके, बुलेटिन्स यांच्या मार्गाने त्यांनी जनजागृतीच्या कार्याला जोर लावला होता. विद्यार्थी चळवळीत प्रजापरिषदेच्या भक्कम व तीव्र आंदोलनाची व उग्र हल्ल्याची भर पडत चालली

होती. विद्यार्थी आंदोलनात रत्नाप्पा कुंभारांनी साक्षपणे भाग घेऊन अनेक कार्यकर्त्यांना प्रजापरिषदेच्या लढयात सामिल करुन घेतले. शेकडो विद्यार्थी व विद्यार्थिनी त्यांच्या कार्यात सहभागी झाले. कापशी, मुरगूड, गारगोटी, इचलकरंजी,कागल, शिरोळ, नांदणी, गडहिंग्लज इ.भागात प्रजापरिषदेच्या बैठका घेण्यात आल्या. या तयारी नंतर रिव्हॉल्वर्स, डायनामायटस,बॉम्ब इ. वस्तू देण्यात आल्या. १० ते १५ सामुदायिक उठावाची केन्द्रे तयार झाली. २ ऑक्टोबर म.गांधी जयंती रोजी संस्थानभर सामुदायिक उठाव झाला. अशावेळी दरबारची शक्ती अपूरी पडू लागली. जनता दडपशाहीला भीक घालत नव्हती तर उलट १९४२ च्या या चळवळीत ग्रामीण जनतेने मोठया प्रमाणात साह्य दिले होते. या भोवतीच्या खेडूतानी भूमिगतांना अन्नपाणी पुरविले होते. त्यामुळेच भूमिगत चळवळ लोक पाठिंब्यावर चालली होती.

रत्नाप्पा कुंभार यांनी पहिल्यापासून राजकीय घटना घडविण्यासाठी संयोजन करुन नेतृत्व किसानांच्याकडे दिले होते. दरबारच्या दडपशाहीच्या चक्रात न गुंतता संघटनेची व शक्तिची किम्मया प्रत्यक्षात दाखविण्यास सुरुवात केली. रत्नाप्पा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली भूमिगत चळवळ चालू होती. भूमिगत चळवळीच्यानेत्यांच्या निवासाच्या जागा कोल्हापूर जिल्हाबाहेर कवठे, नांद्रे, मालगाव,येळवणजुगाई अशा ठिकाणी असत, त्यामुळे शिरोळ तालुक्यातील पी.बी.पाटील , जिनपाल खोत ,तासगांवचे गणपत कोळी वगैरे कार्यकर्त्यांचाही एक मोठा संच रत्नाप्पा कुंभार यांचे नेतृत्वाखाली सामील झाला होता.

भूमिगत चळवळीचा मुख्य रोख सरकारला सतावून सोडण्याकडे होता. कोल्हापूर प्रांतात ही चळवळ रत्नाप्पा कुंभारांच्या नेतृत्वाखाली फार जोमाने काम करु लागली,होती. यामध्ये चावडया जाळणे,पोस्ट लुटणे, रेल्वे स्टेशन नष्ट करणे, तारा तोडणे असे या भूमिगत चळवळीचे मुख्य स्वरुप होते. भूमिगत चळवळीतील अत्यंत धाडसी व अखिल भारतात गाजलेले प्रकरण म्हणजे गारगोटी येथील मामलेदार कचेरीवरील हल्ला होय. याच प्रमाणे बर्मी खजिन्याची लूट ही अत्यंत धाडसाची व आश्चर्ययुक्त घटना याच काळात घडून आली. पुढील

काळात या भूमिगत चळवळीतील प्रसिध्द पावलेल्या कोल्हापूरच्या मंडळींनी महाराष्ट्रातील सुप्रसिध्द जेजुरी खंडोबाचे देवाळ्यावर हल्ला करून संपत्ती लुटली व ती संपत्ती देशकार्यांस उपयोगी आणली.

भूमिगत चळवळ ही कोल्हापूर, सातारा, सांगली या भागात जनतेचे ताकदीवर चालू होती. शस्त्रबळाचा सर्रास वापर करून तसेच दहशतवादाच्या बळावर ही भूमिगत चळवळ आधारली होती, असा प्रचार सरकार तर्फे होत होता. पण वस्तुस्थिती उलट होती हे स्वातंत्र्यभक्त शस्त्रे जमविल, पोलिसांच्या हातूनच लांबवित व प्रत्यक्ष त्याचा वापर करीत. पोलिसांचा दहशतवाद थांबविण्यासाठी व पोलिसांच्या पासून आत्मसंरक्षण करण्यासाठी म्हणून केवळ भिती दाखविण्यासाठी ते शस्त्र वापरीत. राज्य यंत्रणा बंद पाडणे व प्रसंगी स्वत:च्या बलीदानाची तयारी ठेवणे ही त्यांची प्रमुख ध्येये होती. या भूमिगत चळवळीमध्ये संघटना चातुर्याचे व शिस्तिचे नवे धडे रत्नाप्पा कुंभार यांच्या नेतृत्वाखाली तरुण कार्यकर्ते घेत होते. त्या काळात कोणतेच भेदाभेद कोणाच्या चित्तात उरले नव्हते आणि त्यामुळे पडक्या माळावर किंवा मळ्यांत, नद्यांचे भयाण दरडीमध्ये किंवा डोंगर पठारावर वणवण हिंडण्याचे जीवन अनेक कार्यकर्ते महिनान्महिने घालवू शकले. त्याच्या पोटापाण्याची व रक्षणाची महान सेवा हजारो शेतकऱ्यांनी व त्यांच्या कुटूंबियांनी सांभाळली हे दर्शन खरोखरच जनक्रांतीचे होते. या स्फूर्तीप्रद चळवळीची जबाबदारी मुख्यत: नेत्यावर पडते. ही नेतेपणाची जबाबदारी रत्नाप्पा कुंभारांनी अत्यंत कुशलतेने पार पाडली यातील काही महत्वाच्या घटना पुढीलप्रमाणे --

## गारगोटी येथील मामलेदार कचेरीवरील हल्ला --

११ डिसेंबर १९४२ रोजी कूर (ता. भुदरगड) पुल सुरुंग लावून उडविण्याचा प्रयत्न क्रांतीकारकांनी केला पण हा प्रयत्न अपयशी ठरला, पुढे क्रांतीकारकांनी एकत्रित जमून १३ डिसेंबर १९४२ ही रात्र निश्चित केली व त्यादृष्टीने गारगोटी कचेरीवर हल्ला केला पण दुर्दैवाने मॅजिस्ट्रेट यांचा मुक्काम गारगोटी येथे असल्याने त्याच्या संरक्षणासाठी असलेल्या हत्यारी पोलिसांनी गोळीबार केला. या

गोळीबारात नारायणराव वारके यांना आपला प्राण गमवावा लागला. पुढे गारगोटीतील तालुका कचेरीवर क्रांतिकारकांनी हल्ला केला. सब जेल खुला करून तेथील पोलिसांच्या सहा रायफली हस्तगत केल्या. कचेरीवर रॉकेल ओतून कचेरी पेटवून दिली. यामध्ये पाच शुर स्वातंत्र्य सैनिकांना आत्मसमर्पण करावे लागले.[३४]

रेसिडेन्सी बंगला, पाच स्टेशन भस्मसात --

कोल्हापूर संस्थानात कटकोळ महाल, तोरगल - जहागीर, रायबाग महाल, चिंचली, रायबाग स्टेशन हा भाग होता. या भागामध्ये स्वातंत्र्य लढ्याचे व भूमिगत चळवळीचे नेते रत्नाप्पा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली मोठी जाळपोळ झाली.

१) रायबाग स्टेशन भस्मसात --

रायबाग महालातील रायबाग व चिंचली ही दोन स्टेशन स्वातंत्र्य सैनिक आपगौडा पाटील यांच्या मदतीने ८ नोव्हेंबर १९४२ रोजी भर दुपारी १ वाजता नष्ट केली. ३०-४० स्वातंत्र्य सैनिकांच्या तुकडीने स्टेशन मास्तरांना पकडून स्टेशनची यंत्रे फोडली व रॉकेल टाकून स्टेशन जाळले. स्टेशनवर हजर असलेल्या शेकडो लोकांनी स्वातंत्र्य सैनिकांच्या शिस्तीचे व कामाचे कौतुक केले. केन्द्र भस्मसात होताना आनंद व समाधान व्यक्त केले.[३५]

२) चिंचली व विश्रामबाग स्टेशन भस्मसात --

रायबाग महालातील चिंचली स्टेशन व सांगली मिरज फाट्यावरील विश्रामबाग स्टेशन रायबागचे बळवंत कामाप्पा नाईक, लिंगनुरे, कुलकर्णी या स्वातंत्र्य सैनिकांच्या संघटनेने भस्मसात केली.[३६]

३) हातकणंगले स्टेशन भस्मसात --

१३ डिसेंबर १९४२ या सामुदायिक उठावाच्या दिवशी माजी आमदार खंजिरे यांच्या नेतृत्वाखाली ३०-४० सैनिकांच्या पथकाने रात्री ८ च्या सुमारास कबनूर मार्गे स्टेशनच्या अलीकडे प्रयाण केले. रात्री १२ च्या सुमारास मालगाडी गेल्यानंतर सर्वजण स्टेशनवर आले व नियोजित तुकडयांनी आपली नियोजित कामे भराभर सुरु केली. स्टेशनमास्तर व पोर्टर यांच्या घरांना कड्या घालण्यात आल्या. असि.स्टेशन मास्तरना ( इयुटीवरील ) पकडून तिजोरी रिकामी केली. या नंतर एन.आर.पाटील यांचे तीन सहकारी यांनी प्रथम तारा व टेलिग्राफ यन्त्रे निकामी केली. अलगोंडा पाटील यांच्या तुकडीने पहारेकऱ्यांना पकडले. व गनिमी पथकाने दोन डब्बे आणलेले रॉकेल स्टेशनच्या इमारतीवर व फर्निचरवर शिंपडले व सर्वांनी स्टेशनाला आग लावली. हातकणंगले तालुका कचेरी स्टेशनपासून एक फर्लांगावर असतानाही कोठेही फितुरी झाली नाही.[३७]

४) रुकडी स्टेशनवर हल्ला --

रुकडी स्टेशनवर १३ डिसेंबर १९४२ रोजी ४०-४५ जणांच्या गनिमी पथकांने हल्ला करण्याचे निश्चित केले होते. या हल्ल्याचे नेतृत्व दिनकरराव मुद्राळे, बी.जे.पाटील ( किणीकर ), जिन्नाप्पा खबडे ,यांचेकडे मुख्यत: होते. दि.१३ डिसेंबर १९४२ रोजी दुपारी आळत्या जवळ सर्वजण जमले. त्यामध्ये प्रमुख पाच पथके तयार करण्यात आली. प्रत्येक पथकाकडे कामे वाटून देण्यात आली. त्याप्रमाणे स्टेशनला जोडण्यात आलेल्या टेलिफोनच्या तारा जिन्नाप्पा खबडे यांच्या नेतृत्वाखाली तोडण्यात आल्या. टेलिग्राफच्या तार यन्त्रे दगडाच्या साह्याने फोडण्यात आली. एका तुकडीने स्टेशन मास्तर व पोर्टर ला पकडून ठेवले व एका एक तुकडीने स्टेशनच्या फर्निचर व इमारतीवर रॉकेल शिंपडून आग लावली.[३८]

याप्रमाणेच जयसिंगपूर स्टेशनही जाळण्याचा प्रयत्न केला पण त्यामध्ये अपयश आले अशा प्रकारे क्रांतिकारकांनी रेल्वेस्टेशन नष्ट करुन

रेल्वे वहातुकीमध्ये मोठे विघ्न निर्माण केले.

पन्हाळ्यावरील आरामगृह जाळले --

पन्हाळा येथे सरकारी अधिकारी थंड हवेचे ठिकाण म्हणून येऊन रहात होते. सज्जाकोठी येथे रेसिडेंट साठी खास निवास व कचेरी उभारण्यात आली होती. या रेसिडेन्सीतर्फे दक्षिणेतील १८ संस्थानावर अंकुश ठेवण्यात येत होता. कोल्हापूरच्या या स्वातंत्र्य लढ्यात हे थंड हवेचे रेसिडेन्सी कार्यालयच नियकामी करून टाकण्याचा निर्णय घेण्यात आला. १३ डिसेंबर १९४२ या सामुदायिक उठावाच्या दिवशी रात्री हा हल्ला करण्याची जबाबदारी तानसेन नाईक ( टोपणनाव ) यांचेवर टाकली होती. मलकापूर भागातील यळवण जुगाई च्या गनिमी तळावरून तानसेन नाईक यांनी आपल्या १० ते १५ सहकाऱ्यासह पन्हाळ्यावर हल्ला करण्यासाठी प्रवेश केला व रात्री दोन नंतर तेथील पहारेकऱ्यास बंदीवासात ठेवले व रेसिडेन्सी कार्यालयात प्रवेश केला व सर्वत्र रॉकेल ओतून फर्निचर व कार्यालयीन व्यवस्था जाळून टाकण्यात आली. अर्ध्या तासात सर्व कार्यक्रम उरकून गनिमी पथकाने या कचेरीवर तिरंगा ध्वज फडकवला व वंदेमातरम म्हणून प्रयाण केले.[39]

कोल्हापूरात निर्वासित ब्रह्मदेश सरकारच्या कचेरीच्या खजिन्याची भर दिवसा लूट --

गारगोटी हल्ल्यानंतर शहरातील एक साहसी योजना यशस्वी करण्यासाठी श्री रत्नाप्पा कुंभारांनी खास यन्त्रणा तयार करून अनेक स्वातंत्र्य सैनिकांवर जबाबदारी टाकली. कुरुंदवाडची एक सेवादल सैनिक अब्दुल अथणीकर यांच्यावर या कामाची जबाबदारी सोपवली. ती म्हणजे ब्रह्मदेशाचे निर्वासित सरकारची कंट्रोलर ऑफ दि मिलिटरी अकौंन्टसची कचेरी शालिनी पॅलेसमध्ये होती. या कार्यालयाचा हजारो रुपये पगार दरमहा पहिल्या तारखेस कोल्हापूरच्या कोषागारातून कावड्यावर टांग्यातून आणला जात असे. या संबंधी अभ्यास करून एक निष्ठावान स्वातंत्र्य सैनिक लालजी उपाध्ये

SARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

यानी एक योजना आखली व ती योजना आपल्या नेत्याला म्हणजेच रत्नाप्पा कुंभार यांना सादर केली . या संबंधी खास चर्चा करून व जरूर त्या सूचना देऊन रत्नाप्पा कुंभारांनी सुयश चिंतले. यासाठी १ एप्रिल १९४३ तारीख निश्चित करण्यात आली. त्याप्रमाणे स्वातंत्र्य सैनिक रंकाळा घाटावर हजर झाले. जेव्हा खजिन्याचे अधिकारी टांग्यात बसून रंकाळ्याच्या दिशेने जात होते त्यावेळी अथणीकरांनी सेल्यूट ठोकून सरकारकडून आलेला खोटा दिला. त्यांच्याशी हस्तांदोलन करीत क्षणात त्यांच्या हातातील थैली लांबवली. पाठीमागून जाऊन अधिकाऱ्यांनी खोटा उघडून पाहिला असता चिठ्ठीमध्ये दोनच शब्द होते - एप्रिल फुल । अशा तऱ्हेने करवीरच्या स्वातंत्र्य सैनिकांची एक साहसी हल्ला चढवून शासन यंत्रणेला जबरदस्त धक्का दिला व क्रांती लढ्यासाठी परकियांचे २३,३८४ रू.११ आणे हस्तगत केले. शहरभर व शहराभोवती पोलिस आणि घोडदल यांची जोराची धावपळ झाली मात्र त्यांना एकमेचा शोध लागला नाही.[४०]

<u>विल्सनच्या पुतळ्याचे विध्वंस --</u>

कोल्हापूर शहराच्या मध्यवर्ती चौकात गव्हर्नरचा ( विल्सनचा) एक संगमरवरी पुतळा उभा होता. कोल्हापूरच्या स्वाभिमानी नागरिकांना याबद्दल तिरस्कार होता. कारण जनतेच्या पैशावर परकीयांचे उभारलेले हे पुतळे म्हणजे राष्ट्रीय अस्मितेचा अपमान आहे या विचारसरणीने स्वातंत्र्य सैनिकांनी प्रतिकार करण्यास सुरुवात केली.

ऑक्टोबर १९४२ मध्ये महिला स्वातंत्र्यसैनिका सौ. भगीरथीबाई तांबट व सौ. जयाबाई हविरे यांनी भर दिवसा घटस्थापने दिवशी विल्सनच्या पुतळ्यावर डांबर फासून आपल्या भावना व्यक्त केल्या होता.

विल्सनच्या पुतळ्याचा विध्वंस करण्याची योजना स्वातंत्र्य सैनिकांनी आखली. गुलामगिरीची ही निशाणी शहराच्या केंद्रस्थानी दिमाखाने उभी असावी, कशी या मरेंगे मंत्र स्विकारलेल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या पोरपणाला

एक आव्हान होते. याबाबत रत्नाप्पा कुंभारांनी घणाघाताचा संदेश दिला. त्यासाठी १३ सप्टेंबर १९४२ हा दिवस निश्चित करण्यात आला व पहाटे ५ वाजता स्वातंत्र्य सैनिकांच्या एका तुकडीने पोलिस गणवेशात या पुतळ्याचा विध्वंस केला व आपली अस्मिता जागृत असल्याचे सिध्द केले.[४१]

बार्शी - लाईट रेल्वे लुटली --

क्रांती लढ्याचे शूर संघटक रत्नाप्पा कुंभारांनी पोलिसांच्या दडपशाहीला उत्तर देण्यासाठी भराभर हल्ले चढविण्यास सुरुवात केली. त्या दृष्टीने पंढरपूर-मिरज मार्गावर धावणारी बार्शी लाईट रेल्वेवर हल्ला चढविण्याचा आदेश दिला व या हल्ल्यासाठी २७-१२-४६रोजी चालून जाण्याचा आदेश एस.पी.पाटील व अर्जुनवाड चे श्रीपाल चौगुले यांना देण्यात आला. या शिवाय डॉ.माधवराव कुलकर्णी, शंकरराव माने, दत्तोबा तांबट, शाम पटवर्धन यांचे गनिमी पथक रवाना करण्यात आले. डॉ.माधवराव कुलकर्णी यांनी रुळावर दगडांचे गराडे रचून ठेवले होते. सलगर - बेळंकी स्टेशन दरम्यानचे तारांचे दळणवळण तोडण्यात आले. गाडी वळणावर येताच थांबविण्यात आली. स्वातंत्र्य सैनिकांनी टपालाच्या डब्यावर हल्ला केला. सर्व टपाल थैल्या व पोस्टाच्या डब्यातील सर्व सामान लुटून दंडोबाच्या डोंगराचा आश्रय घेतला. अशा प्रकारे भर दिवसा धाडसी हल्ला संपूर्णपणे यशस्वी झाला. पोस्टाच्या थैल्यातून क्रांती लढ्याला दोन हजार रुपये प्राप्त झाले.[४२]

साखरप्याच्या पोस्टाला घेराव --

बार्शी लाईट रेल्वे लुटल्या नंतर काही स्वातंत्र्य सैनिकांनी येळवण - जुगाई येथे आश्रय घेतला . त्या भागातील चावड्या, दारुगुत्ते ,जाळून नष्ट केले. याचवेळी अर्जुनवाडकर मंडळीच्या नावाचा पोलिसात बोलबाला झाला म्हणून त्यांनी मलकापूर मार्गे कोकणात साखरप्याकडे आपला मोर्चा वळवला. स्वातंत्र्य लढ्याबरोबर वाईट चालिरितीचे उच्चाटन करणे हेच चळवळीचे ध्येय होते. त्यामुळे सरकारी कार्यालये, चावड्या, रेल्वेस्टेशन, या बरोबरच दारुगुत्तेही

जाळण्यात येत. या कार्यकर्त्यांना जवळ असलेल्या सातारच्या या रत्नागिरी जिल्ह्यातील गावात दारुगुत्ता चालू असल्याचे कळले, त्यामुळे या मंडळींनी दारुगुत्ता जाळण्याचे व पोस्ट लुटण्याचे ठरवले. जवळ असलेल्या देवळात पोलिस पहारा होता . तेथे काही रायफली होत्या. भरमू चौगुलेंनी त्यातील काही पोलिसाकडून रायफली मिळवल्या अशा वेळी इतर पोलिस जागे झाले त्यावेळी इतर शिपांनी काठीचे तडाखे देऊन त्याना प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला व पुढे दारुगुत्ता जाळून टाकला. शिपाई जखमी झाल्याने पोस्ट लुटण्याचे रद्द करण्यात आले.[४३]

जेजुरीचा हल्ला --

कोट्यावधी रुपयाचे सोने, चांदी, मोत्याचे दागिने असलेल्या जेजुरीच्या खंडोबाकडे सत्ताधाऱ्याची दृष्टी वळण्यापूर्वी जेजुरीचा खंडोबा लुटण्याचा कार्यक्रम रत्नाप्पा कुंभारांनी हाती घेतला व त्याची रुपरेषा आखण्यात आली. त्यादृष्टीने स्वातंत्र्य सैनिकांना कोरेगावला ओळखून नेण्यात आले होते. एक तुकडी कोरेगाव हून व एक तुकडी पुण्याहून जेजुरीला पाठवण्याचे ठरले अशा प्रकारे जेजुरी खंडोबाच्या देवळातून २७ जुलै १९४४ रोजी मौल्यवान वस्तू स्वातंत्र्य सैनिकांनी आर्थिक ओढाताण कमी करण्यासाठी लांबविल्या.[४४]

अज्ञातवासात असताना आपल्या सहकारी कार्यकर्त्यांना रत्नाप्पा कुंभार यानी काही टोपण नावे दिली होती ती खालील प्रमाणे ---

| | मुळ नांव | टोपण नाव |
|---|---|---|
| १ | रत्नाप्पा कुंभार | भास्कर |
| २ | डॉ. माधवराव कुलकर्णी | मधुकर |
| ३ | बाबुराव गोखले | गुणवंत |
| ४ | शंकर कृष्णाजी अनावकर | शशिकुमार |
| ५ | गोपाळराव पाटणकर | कर्ण |
| ६ | दत्तोबा तांबट | तानसेन |
| ७ | गणपती जोती कुंभार | श्रीधर |

| | मुळ नांव | टोपण नांव |
|---|---|---|
| ८ | रामभाऊ शेटये | बळभीम |
| ९ | गोविंदराव उपळेकर | गोतूबाई |

( पुढील नावे उपलब्ध होऊ शकली आहेत )[45]

३ एप्रिल १९४६ रोजी मुंबई प्रांतात कॉंग्रेसचे मंत्री मंडळ अधिकारारुढ झाले. त्यानी लाबडताच कॉंग्रेस कार्यकर्त्यांवरील वॉरन्ट्स काढून टाकली. त्यामध्ये कोल्हापूर संस्थान प्रजापरिषदेचे सचिटणीस रत्नाप्पा कुंभार यांचे वरील वॉरन्ट परत घेण्यात आले होते. रत्नाप्पाण्णा १९४२ पासून भूमिगत राहून कार्य करीत होते. त्याना पकडण्यासाठी कोल्हापूर दरबारने मोठे बक्षिसही जाहिर केले होते पण अखेर पर्यन्त ते सापडले नाहीत. शेवटी मुंबई सरकारच्या आदेशास अनुसरुन कोल्हापूर दरबारने २५ मे १९४६ रोजी राजबंदींची सुटका केली.[46] राजबंदी सुटल्यामुळे सर्वांना आनंद होणे स्वाभाविक होते. विशेषत: प्रजापरिषदेचे सचिटणीस रत्नाप्पाकुंभार व त्यांच्या सहका-यांचा सत्कार करण्यासाठी १ लाख रुपयांची थैली अर्पण करावी या हेतूने ७ जून १९४६ रोजी सत्कार समिती भाई माधवराव बागल यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आली. पण दुर्दैवाने रत्नाप्पा कुंभारांचा पत्ता न लागल्याने सत्कार समितीवर मोठ्या दु:खाने सत्काराचा पैसा परत करण्याची वेळ आली. अज्ञातवासात असताना त्यांच्या पिताजींचे अत्यंदर्शनही होऊ शकले नव्हते केवढा हा त्याग व जाज्वल्य देश निष्ठा ![47]

रत्नाप्पा कुंभार अज्ञात वासातून प्रकट झाले ---

१९४२ च्या आंदोलनातील भूमिगत कार्यकर्त्यांपैकी भारतीय कित्येक अरुणा असफअली, जयप्रकाश नारायण या सारखे प्रांतिक कार्यकर्ते प्रकट होऊन देश सेवेला लागले होते. दरम्यानच्या काळात कोल्हापूरला वीर नाना पाटील, भाई गोरे, भाई जोशी इ. कार्यकर्ते येऊन गेले. त्यानी जाहिर भाषणे केली

परंतु एकही पुढारी रत्नाप्पा कुंभारांच्या विषयी काहीच सांगू शकला नाही. त्यामुळे जनतेमध्ये अनेक शंकाकुशंका निर्माण झाल्या. त्याबाबत जनते कडून भाई बागल यांना रत्नाप्पा कुंभारांच्या विषयी अनेक प्रश्न विचारण्यात सुरुवात झाली. कारण ज्या रत्नाप्पासाठी खंड जमवण्यात आला होता त्या रत्नाप्पा कुंभारांच्या वरील वॉरंट कोल्हापूर दरबारने मागे घेतला तरीही रत्नाप्पा कुंभार प्रकट होत नाहीत म्हणून भाई माधवराव बागल यांनी रत्नाप्पा कुंभार पर्स फंडाचा राजीनामा दिला.[४८]

सप्टेंबर १९४६ मध्ये रत्नाप्पा कुंभार यांनी जनते समोर आपण अज्ञातवासात कां राहिलो याबाबत स्पष्टीकरण दिले त्यात त्यानी क्रांतीच्या काळात करवीरच्या जनतेने केलेल्या सहकार्याचे व त्यागाचे मन:पूर्वक कौतुक केले. तसेच एप्रिल १९४६ अखेरीला सर्व निर्बन्ध रद्द झाल्यावर सुध्दा वर्षा सव्वा वर्षा अज्ञातवासात रहाण्याचे कारण स्पष्ट केले की " कॉंग्रेस आणि त्याचे सहकारी याविषयी सामान्य जनांच्या कायभावना असतात, कॉंग्रेस आणि कॉंग्रेस सारख्या जनहित संवर्धक संस्थांच्या जनहितदायक कार्याचा प्रत्यक्ष परिणाम सामान्य जनावर काय होतो. जनतेच्या ख-या अडचणी व संस्था उध्दाराविषयी आमचे प्रयत्न त्याचा बरोबर काय मेळ बसतो हे सारे त्याल्यात राहून त्यांच्या साध्या व निष्पाप जीवनाचा अवलंब करुन समजून घेण्याची माझी उत्कट इच्छा होती. हे कार्य प्रत्यक्ष आणि दैनंदिन राजकीय अगर धकाधकीच्या कार्यात राहून करणे शक्य नसते. या सर्व गोष्टींचा शांतपणे अभ्यास करण्यासाठी मी वर्षा सव्वा वर्षा पर्यन्त सगळ्याच कामातून विमुक्त होऊन निरनिराळ्या ठिकाणी सामान्यजनांचे जीवन व्यतीत करण्याचा संकल्प करुन आजपर्यन्त माझ्या कर्मभूमिपासून दूर राहिलो. शेवटी रत्नाप्पा कुंभार म्हणतात मला सव्वा वर्षात मिळालेले अनुभव माझ्या पुढील कार्याच्यादृष्टीने माझ्या कल्पनेपेक्षाही अत्यंत बहुमोलाचे आहेत. त्या अनुभवाचे दर्शन माझ्या पुढील कार्यामधूनच होणार आहे. संस्थानी राजकारणाची सद्यस्थिती व त्या संबंधिचे माझे विचार मी येथे प्रत्यक्ष आल्यानंतर सांगत आहे.[४९]

रत्नाप्पा कुंभार हे ९ ऑगस्ट १९४७ या दिवशी प्रगट होत आहेत

याची चाहूल जनतेला लागल्याने त्यांच्या स्वागतासाठी सर्वीर जनता उत्सुक झाली होती. रत्नाप्पा कुंभार यांच्या सत्कार निधीसाठी स्वागत समितीकडे लोकांकडून निधी गोळा होऊ लागला. लोकांच्या मनात मानाचे स्थान मिळवणाऱ्या रत्नाप्पा कुंभाराच्या यशाचे रहस्य त्यांच्या सर्वांगपरिपूर्ण गुणांमधून दिसून येते.

शनिवार ता.९ ऑगस्ट १९४७ रोजी भूमिगत दे.भ.रत्नाप्पा कुंभार ५ वर्षांच्या अज्ञातवास संपवून मिरज येथे पुणा मेलने हजर झाले.[५०] तेथे मिरज संस्थान प्रजापरिषदेचे अध्यक्षांनी त्यांना पुष्पहार अर्पण केला. या नंतर सांगली, कुपवाड, जयसिंगपूर, रामदुर्ग, बुधगांव वगैरे ठिकाणच्या प्रजापरिषदेच्या कार्यकर्त्यांनी त्याना पुष्पहार अर्पण करून त्यांचे स्वागत केले. स्वागतासाठी सुमारे १५००० चा जनसमुदाय उपस्थित होता. या प्रचंड जनसमुदायासमोर रत्नाप्पा कुंभार म्हणाले, ' हिंदुस्थान आता स्वतंत्र झाला आहे. संस्थानी प्रजा स्वतंत्र झाली पाहिजे, त्यासाठी आपण सर्वांनी मिळून प्रयत्न करू या ' या त्यांच्या उद्गारातून संस्थानी स्वातंत्र्याची ओढ त्याना लागलेली दिसून येते.

रेल्वे जयसिंगपूर स्टेशनवर आल्यावर जयसिंगपूर येथील जनतेने त्यांचे स्वागत केले. पुढे निमशिरगाव ही आपणाची जन्मभूमी येथे रेल्वे स्टेशन नसल्याने रेल्वे थांबत नाही म्हणून लोकांनी साखळी ओढून रेल्वे थांबवली व तेथेही त्याचे उत्साहात स्वागत झाले. पुढे रेल्वे कोल्हापूर स्टेशनवर आल्यानंतर या ठिकाणी सत्कार समिती,प्रजापरिषद,नगरपालिका, विडी कामगार संघ या सारख्या निरनिराळ्या संस्थातर्फे त्याचे स्वागत करण्यात आले. या नंतर रत्नाप्पा कुंभार प्रजापरिषदेचे कार्याध्यक्ष भाई माधवराव बागल यांच्यासह हुतात्म्याच्या पुण्यभूमिला वंदन करण्यासाठी गारगोटी येथे रवाना झाले. तेथे त्यानी स्वामी व वारके यांच्या बलिदानाचे स्मरण करून त्या पुण्यभूमिला वंदन केले.

A 11694

भूमिगत राहून संस्थानिक व ब्रिटिश सत्ता यांच्याशी टक्कर देवून प्रकट झालेले जनतेचे लाडके नेते रत्नाप्पा कुंभार यांना पाहून सर्वसामान्यांना अत्यानंद झाला. नागरिकांनी त्यांचे अपूर्व स्वागत करून त्यांना १ लाखाचा

निधी दिला. पण हा निधी त्यानी परत केला. त्याचप्रमाणे स्वातंत्र्य चळवळीतील सर्व खर्चाचा हिशोबही त्यानी जनतेपुढे जाहिर केला.

राजकीय असंतोष व जनतेच्या अडचणी कमी करण्याच्यादृष्टीने रत्नाप्पा कुंभार व भाई माधवराव बागल यानी संयुक्त दौरा काढून ग्रामीण जनतेला जागृत करण्याचा प्रयत्न सुरु केला. मलकापूर, देवाळे, बांबवडे, कोडोली या ठिकाणी जाहिर सभा व कार्यकर्त्यांच्या बैठका घेवून प्रजापरिषदेचे ध्येय धोरण या नेत्यानी जनतेला समजावून सांगितले. त्याचप्रमाणे फलटण, मुधोळ, इचलकरंजी, नांदणी, हेरवाड, दत्तवाड, दानवाड, नृसिंहवाडी, हसुर, अर्जुनवाड, इ. ठिकाणी रत्नाप्पा कुंभार व भाई माधवराव बागल यांनी जाहिर सभा घेतल्या व ठिकठिकाणच्या ग्रामस्थांनी आर्थिक मदत केली.

<u>प्रजापरिषदेचे मंत्रीमंडळ व बेबनाव</u> --

३१ मार्च १९४७ रोजी करवीर गादीवर शहाजी छत्रपती या संस्थान राज्याचे दत्तक विधान झाले.[५१]

१५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. प्रजापरिषदेने शहाजी महाराजा बरोबर वाटाघाटीची चर्चा केली परंतु या वाटाघाटी फिसकटल्या, त्यामुळे प्रजापरिषदेने लढ्याची जय्यत तयारी केली व हा लढा कोणत्या पध्दतीने करावयाचा याबाबतचे एक पत्रक २०-१०-१९४७ रोजी प्रसिध्द केले. या पत्रकामध्ये असे म्हटले की " डिसेंबर १९४७ च्या अखेरपर्यन्त दरबारने प्रजापरिषदेची जबाबदार राज्य पध्दतीची मागणी पूर्ण केली नाही तर सार्वत्रिक हरताळ, सभा, मिरवणूका, निषेध, निदर्शने, दारुबंदी, ताडीबंदी यातून वाढत जावून सारांबंदी व पूर्ण असहकार असा कार्यक्रम आखला जाईल.[५२]

या लढ्यात शेतकरी, मजूर, नोकर वर्ग यांची अनुकूलता होती संस्थान बाहेरची व देशातील परिस्थिती अनुकूल होती, प्रजापरिषदेच्या तयारीची व बाहेरील परिस्थितीची जाणिव दरबारला असल्याने छत्रपती शहाजी महाराजांच्या कडून प्रजापरिषदेच्या पुढाऱ्यांना वाटाघाटीसाठी बोलावण्यात आले.

२७-९-१९४७ ते १८-१०-१९४७ पर्यंन्त छ. शहाजी महाराजां बरोबर प्रजापरिषदेच्या शिष्टमंडळाने पाच बैठका चर्चा केली. महाराजांकडे कोणते राखीव अधिकार असावेत व घटना परिषदेचे स्वरुप कोणते असावे याबाबत तडजोड होऊ शकली नाही.

१४-१०-१९४७ या दसऱ्याच्या मुहूर्तावर श्रीमंत छ.नी काही राखीव बाबी स्वत:कडे ठेवून संपूर्ण सत्तांतर करण्याचे दर्शविले. त्यानी केलेल्या घोषणेनुसार छत्रपतीच्यांकडे ---

१) छत्रपतींचा खाजगी खर्च व त्याचे अधिकार,

२) सैन्य,

३) आणीबाणीची परिस्थिती,

४) जहागिरदार व इनामदार,

५) अल्पसंख्याकांचे संरक्षण,

६) परराष्ट्रसंबंध इ. अधिकार ठेवण्यात आले.

वरील राखीव बाबी सोडून ताबडतोब जबाबदार राज्यपध्दती स्थापन करण्यासाठी नवीन घटना कायद्यात सुधारणा करण्याचे छत्रपतीनी ठरविले. त्यासाठी घटना सुधारणा सल्लागार समिती नेमण्याचे ठरविले. ही समिती प्रातिनिधिक असावी म्हणून नवीन घटना कायद्याप्रमाणे विधिमंडळाच्या विस्तृत मतदानाने नव्या निवडणूकी घेण्याचे ठरविले अशा तऱ्हेने निवडणूकी घेऊन अस्तित्वात येणाऱ्या विधिमंडळातून घटना समितीची निवड होणार होती. नवीन घटना तयार होईपर्यंन्त हंगामी मंत्रीमंडळ विधिमंडळातून बनविण्यात येणार होते.[५३]

विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर छत्रपतीनी जाहिर केलेली नवी घटना ही सरदार वल्लभभाई पटेल यांच्याकडे पाठवली. त्यामध्ये त्यानी काही दुरुस्त्या सुचवल्या पुढे दि. २-११-१९४७ रोजी छत्रपती शहाजी महाराजांनी प्रजापरिषदेच्या कार्यकर्त्यांना निमंत्रित केले व या बैठकीत वाटाघाटी होऊन प्रजापरिषदेच्या अधिपत्याखाली जबाबदार शासन पध्दतीची मागणी व छत्रपतींस मान्य करणे

भाग पाडले. प्रजापरिषदेस करवीर संस्थानातील प्रातिनिधिक संघटना म्हणून मंत्रीमंडळ स्थापन करण्यास सांगितले.

प्रजापरिषद व छत्रपती यांच्यात झालेल्या समझोत्यात पुढील बाबीबाबत तडजोड म्हणून सर्वांनी मान्यता दिली.

१. संस्थानातील सैन्य छत्रपतींच्या ताब्यात राहिल व त्याचा वापर मंत्र्यांच्या सल्ल्यानेच केला जाईल.
२. शासकीय नोकरांची भरती लोकसेवा आयोगाकडून केली जाईल.
३. हिंदी सरकार तह व इतर संस्थान तहात महाराजांची संमती हवी.
४. जहागीर व इनामी प्रश्न महसूल मंत्री कायद्याप्रमाणे सोडवतील.
५. निवडणूक घेवून घटना समिती स्थापन केली जाईल व ती घटना छत्रपती मान्य करतील.
६. दरबारातील पूर्वीचे तीन मंत्री व प्रजापरिषदेचे चार मंत्री आणि पंतप्रधान असे आठ मंत्री असतील. पंतप्रधान चर्चेत भाग घेतीलपण मत देणार नाहीत . प्रजा परिषदेच्या मंत्र्यातून मुख्यमंत्र्याची निवड केली जाईल.

या समझोत्यास संमती देण्यासाठी झालेल्या प्रजापरिषदेच्या बैठकीत रत्नाप्पा कुंभार यानी ठराव मांडला व श्रेष्ठी यांनी अनुमोदन दिले . हा ठराव कार्यकारी मंडळाने एकमताने मान्य केला.[५४]

काळाची पाऊले ओळखून वागण्याची गरज छत्रपती शहाजीराजांना होती. संपूर्ण संस्थान भारतीय संघराज्यात विलीन करण्याची छत्रपतीची तयारी नव्हती. आपली गादी टिकवण्यासाठी प्रजापरिषदे बरोबर समझोता करणे आवश्यक होते. त्यादृष्टीने प्रजापरिषदे बरोबर तडजोड करण्यात आली व या तडजोडीनुसार राखीव अधिकार वगळून बाकी सर्व राज्यकारभार लोक नियुक्त मंत्र्यांच्या हाती देण्यास छत्रपतींनी मान्यता दिली. प्रजापरिषदेच्या नियंत्रणा - खाली असलेले नवे हंगामी मंत्रीमंडळ विधान मंडळाची निवडणूक होईल व निवडणूक होताच दोन्ही सभागृहातील नव निर्वाचित सदस्यांची घटना समिती

छत्रपतींच्या अधिपत्याखाली संपूर्ण तथा जबाबदार राज्यपध्दती स्थापन करण्याच्या उद्देश्याने मसुदा तयार करील असे तडजोडीचे स्वरुप होते.

अशाप्रकारे करवीर जनतेने अर्ज, विनंत्या, ठराव, कायदेभंग, राजद्रोह राजकीय बंडखोरी, क्रांती या मार्गाने चळवळ केली. त्याग व संघ शक्तीच्या जोरावर हे यश प्राप्त झाले होते. करवीर संस्थानचा राज्यकारभार करवीर जनतेच्या हाती आला पाहिजे हे प्रजापरिषदेचे ध्येय अखेर गाठले. न्याय, महसूल, अर्थ, पुरवठा ही खाती लोकमंत्र्यांच्या हाती देण्याचे निश्चित झाले.

११ नोव्हेंबर १९४७ रोजी प्रजापरिषदेच्या कार्यकारणीने हंगामी मंत्रीमंडळात प्रजापरिषदेचे प्रतिनिधि म्हणून चौघांची नावे निश्चित करण्याच्या प्रश्नावर चर्चा झाली. यात माधवराव बागल हे मुख्यमंत्री राहातील व हंगामी मंत्रीमंडळातील त्यांचे सहकारी म्हणून म.दु. श्रेष्ठी (वकिल), रत्नाप्पा कुंभार, डी.एस. खांडेकर (वकिल) यांची निवड केली.[५५]

१७ नोव्हेंबर १९४७ रोजी प्रजापरिषदेच्या कार्यकारिणीची खाते विभागणी साठी भरलेली सभा संबंध दिवसभर चालू होती या मध्ये (१) मंत्र्यांची खाते विभागणी (२) पार्लमेन्टरी बोर्ड (३) कार्याध्यक्षपद या बाबींवर कार्यकारी मंडळात एकमत होऊ शकले नाही.[५६] आणि प्रजापरिषदेमध्ये मत - भेदाचे वातावरण निर्माण झाले. यात मराठा विरुध्द लिंगायत असे जातीय तेढयाचे स्वरुप आले हे माधवराव बागल यांनी अखिल भारतीय संस्थानी प्रजापरिषदेचे अध्यक्ष शेख अब्दुल्ला यांना लिहिलेल्या पत्रात दिसून येते.

" संस्थानच्या एकूण ११ लाख लोकसंख्ये पैकी लिंगायतांची संख्या फक्त ६० हजार आहे. गेले काही दिवस श्रेष्ठी बरोबरच्या माझ्या संबंधामध्ये तणाव निर्माण झालेला आहे. माझे त्यांच्याशी मतभेद असूनही मी त्यांचा समावेश मंत्रीमंडळात करीत आहे असे मी त्यांना सांगितले. कोल्हापूर संस्थानात लिंगायतसारख्या संख्येने लहान जातीचे दोन प्रतिनिधि घेण्यास [illegible] अन्य अल्पसंख्याक जातीच्या मानवी हक्कांकडे दुर्लक्ष करण्यात श्रेष्ठी व कुंभार या दोघांनीही हरकत घेतली नाही. "[५७]

SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

कार्यकारिणीच्या एकूण १५ सभासदांपैकी ८ सभासद श्री रत्नाप्पा कुंभार गटाचे तर ७ भाई माधवराव बागल गटाचे होते. रत्नाप्पा कुंभार यांच्या पाठीमागे बहुमत असल्याने त्यांना गृहखाते द्यावे असे ठरविण्यात आले. माधवराव बागलांनी गृहखाते स्वतःकडे घेतले व म.दु.श्रेष्ठी यांच्याकडे अर्थखाते दिले तर डी.एस.खांडेकर यांचेकडे महसूल खाते सोपविण्यात आले व या तीन खात्यांच्या तुलनेने कमी महत्वाचे पुरवठा खाते रत्नाप्पा कुंभार यांना देण्यात आले. म.दु.श्रेष्ठी व कुंभार यांना हे खाते वाटप मान्य नव्हते म्हणून खाते वाटपाबाबत प्रजापरिषदेच्या कार्यकारिणीने निर्णय द्यावा असे सुचवले. परंतु गृहखाते स्वतः भाई माधवराव बागल यांना स्वतःकडे ठेवावयाचे होते ते न ठेवता आल्याने त्यांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिला. पाठोपाठ म.दु.श्रेष्ठी व रत्नाप्पा कुंभार यांनीही मंत्रीपदाचे राजीनामे दिले व त्यांच्यासह एकूण आठ सभासदांनी राजीनामे देऊन आपली भूमिका स्पष्ट करणारे पत्रक काढले ते पुढीलप्रमाणे ----

STATEMENT BY THE EIGHT MEMBERS OF THE WORKING COMMITTEE OF THE KOLHAPUR STATE PRAJA PARISHAD WHO HAVE TENDERED THEIR RESIGNATIONS

We, the undersigned eight out of the fifteen members of the Working Committee of the Kolhapur State Praja Parishad, have tendered our resignations of our membership of the Working Committee to the Working President, Shri M.K.Bagal, on 17 November 1947. Two ofus, namely, Shri M.D.Shreshthi and Shri Ratnappa Kumbhar, have also submitted their resignations of Ministership in the interim Government of Kolhapur State. We offered our resignations not out of a desire to get into power but as a protest against the undemocratic behaviour of Shri Bagal, the Working President who having been in league with the Maharaja did not take his colleagues into confidence, regarded his own person superior to the

Praja Parsihad, and acted contrary to the directions of the Working Committee. We are here stating bare facts bearing on the situation for the information of the public.

(I) On 12.11.1947 after a discussion in the meeting of the Working Committee it was decided that the following four persons, namely, Shri M.K.Bagal, Shri M.D.Shresththi, Shri Ratnappa Kumbhar and Shri D.S.Khandekar should represent the Praja Parishad on the interim Ministry.

(2) On 14 November 1947 a meeting of these four Minister-designate was arranged at 4 p.m. for deciding allotment of portfolios amongst themselves. Shri Bagal came to the meeting late by one hour and stated that as he had gone to the place he was delayed. On asking him what had transpired at the palace, he retorted that he had some private discussion with the Maharaja which he said he would not disclose to them. Then a discussion ensued. At the outset Shri Bagal gave out that he would take up the portfolios of Education and Home and Shri Khandekar that of Revenue; the rest of the protfoios may be alloted by the two amongst themselves. Shri Ratnappa Kumbhar thereupon expressed his opposition to the dictatorial way in which those proposals were placed before the meeting. Shri Bagal insisted on his retaining the Home Department as Chief Minister-designate. If may be noted that nobody till then was elected as Chief Minister-designate. The discussion prolonged without any definite decision being arrived at. In the end, Shri Ratnappa told Shri Bagal that if the latter in his capacity of the Working President gave them a written order they would abide by it. This meeting ended without coming to any definite conclusion.

(3) On 15 November 1947, the oath taking ceremony of the four Ministers took place at the place.

(4) On the 16th inst. a Cabinet meeting ofthe seven Ministers was arranged at 9.30 a.m. In order to take a decision on the vexed question of division of profolios a prior meeting of the four Parishad Ministers was convened at 7.30 a.m. at Shri Shreshthi's residence. Shri Bagal and Shri Khandekar did not attend the meeting at the appointed time and as the Working Committee was scheduled to meet at 9 a.m. , this meeting could not take place and even the Cabinet meeting called at 9.30 a.m. was postponed to 4 in the evening.

(5) In the meeting of the Working Committee held at 9 a.m. discussion began on the subject of appointment of a parliamentary board but even here at the outset Shri Bagal asserted that he, the Working President, had entered the Ministry and as such he would not subject himself to the direction of the parliamentary board. Hence it was decided that the Working Committee itself should act as the parliamentary board. Accordingly the Working Committee passed a resolution recording its strong protest against the orders passed by the Darbar ( after the announcement of the agreement ) concerning new appointments, promotion etc. in the civil services and directed the Parishad Ministers to abrogate those orders at the every commencement of assuming their charge.The Working Committee meeting adjourned at 2 p.m. to meet again at 9 p.m.

(6) On the 16th it had been agre d to hold a meeting of the four Parishad Ministers at 3 p.m. prior to the postponed Cabinet meeting of the seven Ministers in order to take a decision regarding the allotment of portfolios. But Shri

Bagal and Shri Khandekar having not turned up again at the appointed time this meeting could be held only at 4.30 p.m. necessitating a further postponement of the seven Ministers' Cabinet meeting to the next day at 9 a.m.

The meeting of the four Ministers commenced at 4.30 p.m. and after a (brief ) discussion Shri Bagal said that regarding the division of portfolios amongst themsleves the matter be referred to the Working Committee itself, whereupon Shri Ratnappa implored that it was not proper to entrust that matter to the Working Committee ; instead, they should decide it themselves. Before they could arrive at an agreed solution of the problem Shri Bagal and Khandekar left the meeting and went away.

(7) That very night, as announced earlier, the Working Committee was to have met at 9 p.m. , but Shri Bagal all of a sudden directed that the meeting was adjourned sine die and that the members coming from the mofussil should leave Kolhapur for their destinations. Shri Barale, the General Secretary, himself came to Shri Shreshthi's house to communicate to Shri Ratnappa Kumbhar of the meeting. There Shri Shreshthi gave a written requisition to the General Secretary, wherein he pointed out that as no decision regarding the allotment of portfolios was finally arrived at, and as the Cabinet meeting of the seven Ministers was scheduled to take place the next morning at 9 a.m., it was but necessary that question be decided in the Working Committee and hence the meeting should be held. Consequently, after an hour the General Secretary brought to Shri Ratnappa and Shreshthi the message of Shri Bagal that the Working Committee would meet the next day at 9 in the morning.

(8) On the 17th, when the Working Committee met at 9 a.m., three issues were placed before it for a final decision. They were (1) allotment of portfolios, (2) the incompatibility of one and the same person working as President and Minister and (3) appointment of a parliamentary board for the purposes of selection of candidates etc. for the ensuing election to the Kolhapur Legislature.

When the first issue came up for consideration, votes were taken to decide whether the matter should be again left to the vote of the members for an ultimate decision. The majority favoured the method of voting and as a result when the votes were actually taken, the majority decided to entrust the porfolio of Home Affairs to Shri Ratnappa Kumbhar After deciding about the portfolios of Finance and Revenue, the majority again decided to allot Supply to Shri Ratnappa Kumbhar ,Shri Bagal himself casting his vote in Ratnappa's favour. In deciding about Finance and Revenue, Shri Bagal used his individual as well as casting vote and thus Shri Khandekar was allotted Revenue and by a single casting vote Shri Shreshthi was entrusted with Finance.

When the second issue, namely, that one and the same person cannot act both as the Working President of the Parishad and as a Minister in the Cabinet, Shri Bagal instantaneously said that that point need not be considered at all, for as he was not allotted Home which he very much desired to have, he would tender his resignation of Ministership. He accordingly recorded his disapproval of the Working Committee's decision regarding himself in the letter of resignation itself and tendered the same to the Working Committee .The Working Committee, thereupon, requested him to withdraw the

resignation, bringing to his notice that tendering the resignation at that time was tantamount to disregarding the Working Committee's own direction in the matter. Shri Bagal replied that he would at no cost withdraw the resignation; the Working Committee might take any disciplinary action him if they so chose.

In deciding not to act according to the direction of the Working Committee, Shri Bagal flouted the Working Committee. He also displayed the attitude of a dictator in the matter of allotment of portfolios, acting in the wrong belief of himself being the Chief Minister. As a protest against these flagrant breaches of democratic prodedure, we the eight members of the Working Committee submitted our resignations. On the strength of our majority in the Working Committee we could have accepted Shri Bagal's resignation of Ministership and appointed another person as a Minister in his place, but we thought it better not to use our majority strength. Instead we decided to place our case before the central body of the Praja Parishad for its decision and consequently we came out tendering our resignations (from) the working committee.

Shri Bagal in his statement published on 19 November 1947 says that hewas entrusted with the leadership of the four Praja Parishad Ministers. This is quite wrong; had be been entrusted with such leadership and the power to allot protfolios amongst his colleagues, he would not have at all called the meeting of the Working Committee on the 17th to consider these same matters. He actually called the meeting to place this issue before it and decided the matter in the

light of the votes cast in the meeting.

His contention in the statement that he was made Minister without portfolio is also absolutely mistaken. For, excepting Home, Finance, Revenue and Supply, some of the remaining portfolios like Education would have been entrusted to him. When it was proposed that Supply should be given to him, he himself cast his vote in favour of Shri Ratnappa Kumbhar, allotting Supply to him.

We have placed before the public the facts as they occurred and we hope that the public will now be in a position to appraise the situation.[58]

Ratnappa Kumbhar
Nizam Kazi
M.D.Shreshthi
Shankarrao Mane
B.S.Patil
Dada Ramchandra Magdum
Balawant Kamappa Naik
R.J.Bagade.

८ जणांनी कार्यकारिणीच्या सदस्यत्वाचे राजीनामे दिले आणि १७ नोव्हेंबर १९४७ रोजी घडलेल्या प्रकाराबाबत निर्णय देण्यासाठी प्रजा - परिषदेच्या केन्द्रीय मंडळाची बैठक बोलावण्याची त्यांनी मागणी केली.

१९ नोव्हेंबर १९४७ रोजी भाई माधवराव बागलांनी एक पत्रक काढले. प्रजापरिषदेतर्फे हंगामी मंत्रिमंडळात सामील होणाऱ्या चौघा मंत्र्यांचे नेतेपद आपणास दिलेले असल्याने खाते वाटप करण्याचाही आपल्याला अधिकार होता असे माधवरावांचे म्हणणे होते. या उलट त्यांना नेतेपद तसेच खाते वाटप करण्याचा अधिकार देण्यात आला नव्हता असा कुंभार गटाचा दावा होता हे वरील पत्रकातून स्पष्ट होते.

शहाजी छत्रपती व कोल्हापूर संस्थान प्रजापरिषद यांच्यामध्ये समझोता झाल्याचे कळताच सरदार पटेलांनी रत्नाप्पा कुंभार यांना अभिनंदनाची तार

पाठवली तसेच तडजोडीचा मसुदा मागवला त्याप्रमाणे रत्नाप्पा कुंभार यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांना पत्र पाठवून सर्व खुलासा केला तो पुढीलप्रमाणे --

Kolhapur
24 November, 1947.

My dear Sardarji,

I received your two telegrams. One expressing congratulations and another asking for detailed information regarding the settlement arrived at between the Kolhapur Praja Parishad and the Maharaja. Owing to the internal grave crisis in the Praja Parishad itself I could not write to you earlier nor could send the required information in time; for this unavoidable delay on my part, Sardarji, I hope you will kindly excuse me.

The tragic event of this our internal crisis has had a long and chequered history behind it. Suffice it here to say that we had prepared ourselves for the final struggle with a certainty for complete success, but as bad luck would have it, the Maharaja proved successful in ensnaring our Praja Parishad President, Shri M.K.Bagal and winning him over to his side. We were compelled to accept the settlement by a peculiar force of circumstances that we were placed in. In spite of this we tried to make the settlement as less faulty as possible. And the good effect of this settlement was all dependent upon the strength of the ministry which was to be instituted by the Praja Parishad. As a result of this. We decided to enter the interim Ministry and selected our front rank leaders including our President, Shri M.K. Bagal, for four ministerships. But immediately after a

suspicion lurked in our mind, which to our regret proved to be true by later events, that Shri Bagal was secretly in league with the Maharaja and that disregarding his own colleagues he was determined to use the Praja Parishad as a King's party and that too on communal lines.

Thus we found ourselves in a very intriguing situation and ultimately decided to dissociate from Shri Bagal Consequently we, the majority members of the working committee tendered our resignations ( from ) the Working Committee.

Immediately after we, the resiging members issued a detailed statement of which a copy is sent herewith fro your information. This statement will, I hope, give you an idea as to the present Kolhapur situation and a true perspective of the stand we have taken.

We have sent a requisition to the President to call an entraordinary session of the contral body of our. Praja Parishad. In that session we are quite sure that the verdict of that body will be in our favour and we hope once again to hold aloft the Praja Parishad flag on a completely non-communal basis.

I am also sending a copy of the draft covenenl entered into by the Maharaja with the Praja Parishad.

Sardarji, we are indeed at this stage struggling against great odds in the grave internal crisis. I shall let you know about further development as events occur in the future.

Kindly convey my best regards to Shri Maniben.[59]

Yours Sincerely,
RATNAPPA KUMBHAR.

कार्यकारिणीच्या ८ मंत्र्यानी राजीनामे देताच २० नोव्हेंबर १९४७ रोजी माधवराव बागल यानी आपले धाकटे बंधु श्री वसंतराव बागल यांना आपले जागी मंत्री म्हणून निवड केली.[६०] व इतर सात मंत्र्यांना निवडीस दरबारकडून मान्यता मिळाली. पुढे कार्यकारिणीतील राजीनामा दिलेल्या रत्नाप्पा कुंभार व म.दु.श्रेष्ठी सह आठ सदस्यांनी २२ नोव्हेंबर १९४७ रोजी भाई माधवराव बागलाच्या कृतीचा निषेध केला. कोल्हापूर संस्थान प्रजा - परिषदेच्या मध्यवर्ती सभेच्या २६ सभासदांनी प्रजापरिषद घटनेच्या १३ व्या कलमान्वये मध्यवर्ती ४ डिसेंबर पूर्वी बोलवण्याची मागणी कार्याध्यक्ष भाई माधवराव बागल यांचेकडे केली.[६१] कार्यकारिणीतून रत्नाप्पा कुंभाराचा गट बाहेर पडल्याने भाई माधवरावांनी कार्यकारिणीची पुर्नरचना केली आणि २ डिसेंबर १९४७ रोजी या पुर्नरचित कार्यकारिणीने मध्यवर्तीची बैठक बोलावण्याची आवश्यकता नाही असा निर्णय घेतला.[६२]

भाई माधवराव बागल आणि रत्नाप्पा कुंभार या दोघांच्या गटामध्ये मतभेद वाढत चालले होते त्याचा परिणाम दक्षिण महाराष्ट्रातील अन्य संस्थानानी स्थापन केलेल्या प्रादेशिक परिषदेवर उमटत होते. दक्षिण महाराष्ट्रातील संस्थानाच्या प्रादेशिक परिषदेचे अध्यक्ष या नात्याने भाई माधवराव बागलानी १४ डिसेंबर १९४७ रोजी कोल्हापूरला शाहुपूरीतील प्रजापरिषदेच्या कार्यालयात प्रजापरिषदेची बैठक बोलवली तेव्हा भाई माधवराव बागल यांच्या विरुध्द अविश्वासाचा ठराव मांडला. परिषदेच्या २३ सभासदा- पैकी १३ जणांनी या ठरावावर प्रथम चर्चा व्हावी असा आग्रह धरला. परंतु भाई माधवराव बागलांनी दुर्लक्ष केले. १५ डिसेंबर रोजी अविश्वासाचा ठराव वादावादी झाली व बैठकीचे विसर्जन झाले. यानंतर भाई माधवराव बागलाच्या विरोधकांनी रामभाऊ शेट्यांच्या घरी बैठक घेतली. व तेथे हजर असलेल्या २३ पैकी १४ सभासदांनी बागलाच्या विरोधीचा अविश्वास ठराव मंजूर केला.[६३]

दक्षिण महाराष्ट्रातील संस्थानाच्या प्रादेशिक परिषदेत रत्नाप्पा कुंभारांच्या मागे बहुमत होते. भाई माधवराव बागल व रत्नाप्पा कुंभार यांच्यात दोन तट पडले होते. यामध्ये भाई माधवराव बागल यांचा कोल्हापूर

विलिनिकरणास विरोध होता तर रत्नाप्पा कुंभार गटाचा विलिनिकरणास पाठिंबा होता.

संस्थान विलिनिकरणास सुरुवात --

दक्षिण संस्थान प्रादेशिक विभाग मंडळाचे कार्याध्यक्ष भाई माधवराव बागल यांनी कोल्हापूर संस्थान प्रजापरिषदेचे कार्याध्यक्ष या नात्याने प्रजा - परिषदेच्या कार्यकारिणीने १७-११-१९४७ रोजी दिलेल्या आदेश मान्य केला नाही तसेच कार्यकारिणीच्या आठ सभासदांनी राजीनामे दिल्यानंतर निर्माण झालेल्या राजकीय परिषदेचा विचार करण्यासाठी मध्यवर्तीची मागणीही त्यानी धुडकावून लावली. याबाबतचा भाई माधवराव बागल याना अखिल भारतीय देशी राज्य लोक परिषदेसारख्या लोकशाही प्रधान संस्थेच्या घटक विभागाचे अध्यक्ष म्हणून भाई माधवराव बागल यांचेवर या प्रादेशिक विभाग मंडळाचा विश्वास राहिला नाही, त्यामुळे १४-१२-१९४७ रोजी दक्षिण संस्थान लोकसभेच्या कार्यकारी मंडळाची सभा झाल्यावेळी संस्थाने मुंबई प्रांतात विलिन करण्याचा ठराव पास करण्यात आला. त्यामुळे दक्षिणी संस्थानचे संघराज्य करण्यापेक्षा त्यांचे विलिनिकरण करण्यातच जनतेचे हित आहे अशा प्रकारचे मत दक्षिणी संस्थानातील प्रजेच्या पुढाऱ्यांना कळून येऊ लागले. संघराज्य व विलिनिकरणासंबंधी काही कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांनी गैरसमज निर्माण केले, त्यामुळे संघराज्य विरोधी वातावरण निर्माण होऊ लागले. १७-१०-४७ रोजी भोर येथे ८ संस्थानिकानी ( औंध, भोर, फलटण, मिरज, मिरजमळा, सांगली, कुरुंदवाड व रामदुर्ग ) निर्माण केलेल्या दक्षिणी संस्थानाच्या संस्थानिकाना आपल्या दक्षिणी संस्थानाचा संघराज्याबद्दल काळजी वाटू लागली.[64] त्याबाबत त्यानी सरदार पटेल यांची भेट घेतली असता, त्यानी सांगितले की विलिनिकरणाबाबत राजा व प्रजा यांचे एकमत असेल तर त्याना हिंदी संघराज्यात सामील करुन घेऊ या आश्वासनानुसार जमखिंडी राजेसाहेबांनी स्वतःचे संस्थान मुंबई प्रांतात सामील करण्याचा निर्णय जाहिर केला. या निर्णयाप्रमाणे मिरज संस्थान प्रजापरिषदेनेही संघराज्या ऐवजी विलिनिकरणाची मागणी केली.

ब्रिटिश साम्राज्याच्या मगरमिठीतून भारताला मुक्त करण्यासाठी धैर्याने लढण्याचा आदेश रत्नाप्पा कुंभारानी आपल्या अनेक सहका-यांना दिला होता. या स्वातंत्र्य लढ्यात परकियांशी लढावे लागेल, तर स्वातंत्र्य प्राप्ती नंतर स्वकीयांशी लढण्याची वेळ येऊन ठेपली. संस्थानी प्रजाजनांना गुलामगिरीतून मुक्त करावयाचे होते या लढाईसाठी अखिल भारतीय पाठिंबा मिळवावयाचा होता, त्यासाठी वल्लभभाई पटेल यांची भेट घेऊन रत्नाप्पा कुंभार व त्यांचे सहका-यांनी संस्थानाचे विलिनीकरण करावे असा ठराव मांडला व तो पास झाला यातून त्यांच्या धैर्याचे व चिकाटीचे दर्शन त्यांच्या हितशत्रूपासून हितचिंतकापर्यन्त सर्वांना दिसून आले. दक्षिणी अठरा संस्थाने संघराज्यात विलीन करावयाची व राष्ट्रीय नेत्याचे, एकसंघी भारताचे स्वप्न पूर्ण करावयाचे असा ध्यास रत्नाप्पा कुंभारानी घेतला व त्यादृष्टीने स्वतःची धावपळ सुरु केली. मात्र या कामात अनेक अडथळे आले. ज्या सहका-यांनी आजपर्यन्त प्रेमाने खांद्याला खांदा भिडवून काम केले तेच सहकारी या वेळी आपल्याच्या विरुध्द दंड थोपटून उभे राहिले होते. परंतु देशहितासाठी त्यानी मित्र प्रेम झुगारले व ते कामास लागले. दक्षिणी संस्थानाच्या संघ राज्याचे व घटना समितीचे औपचारिक उद्घाटन २०-१२-१९४७ रोजी मिरज येथे श्री कमल नयन बजाज यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले.[६५] यावेळी समाजवादी कार्यकर्त्यांनी निदर्शने करुन विरोध प्रकट केला. अध्यक्षाचे भाषणाही दुटप्पी होते. त्यामुळे या समारंभाच्या वेळी प्रदर्शित झालेले लोकमत व पुढे मंत्रिमंडळाच्या अनावामुळे राज मंडळास विलीनीकरण करणे इष्ट वाटले. ता. २१-१२-१९४७ रोजी झालेल्या बैठकीत पुढील ठराव करण्यात आला "नवीन घडलेली घटना व एकंदर लोकमत अजमावता असा ठराव करण्यात येत आहे की, संघराज्याची घटना तयार करीत न बसता मुंबई प्रांतात विलीन होण्याची जर संघराज्यातील संस्थानी जनतेची इच्छा असेल तर संस्थानिक त्यांच्या मार्गाच्या आड येणार नाहीत.[६६] अशा प्रकारे दक्षिण महाराष्ट्रातील १८ संस्थाना पैकी ९ संस्थाने मुंबई प्रांतात विलीन करण्याचे ठरविले.

दक्षिण संस्थान लोकसभा कार्यकारी मंडळात ६-१-१९४८ रोजीच्या

बैठकीत भाई बागलांच्या विरुध्द अविश्वासाचा ठराव पास करण्यात आला. त्यांच्या जागी रत्नाप्पा कुंभार यांची नियुक्ती झालेने त्यानी पुढील ठराव पास केला.

१. संस्थानी प्रजापरिषदांनी विलिनिकरणास पाठिंबा द्यावा,
२. अक्कलकोट, जत, जंजिरा, मुधोळ येथील चळवळीस सहाय्य करावे,
३. घटना समिती सार्वभौम असल्याने तीच विलिनीकरणाचा निर्णय घेऊन शकेल.[६७]

जी संस्थाने विलिनिकरणास तयार नव्हती व ज्यांना कोल्हापूरच्या छत्रपतिचा पाठिंबा आहे असे वाटत होते अशा अक्कलकोट, जंजिरा, मुधोळ, जत या चार संस्थानात चळवळ करण्याचे व प्रजापरिषद भाविण्याचे रत्नाप्पा कुंभार यांनी ठरवले. प्रजापरिषदेमार्फत पाठविलेले शिष्टमंडळाने संस्थानी अधिका-यांशी तडजोड करण्याचा प्रयत्न केला परंतु वाटाघाटी फिसकटल्या, त्यामुळे रत्नाप्पा कुंभार यांच्या नेतृत्वाखाली अक्कलकोट प्रजापरिषदेने जबाबदार राज्य पध्दतीसाठी पहिला हल्ला १-१-१९४२ रोजी अक्कलकोटवर चढविला. अक्कलकोट दरबार व रत्नाप्पा कुंभार यांच्यामध्ये तडजोड होऊन शकली नाही. म्हणून सत्याग्रह सुरु झाला. लोकांची मशालीची मिरवणूक काढून चावडीतील सरकारी दप्तर ताब्यात घेतले. अक्कलकोट मध्ये सत्याग्रह शिबिर उघडण्यात आले. त्यात १५०० स्वयं सेवकांनी सहभाग घेतला. मिरवणूकीवर गोळीबार करण्यात आला, त्यामुळे संस्थानात शांतता निर्माण करण्यासाठी राजेसाहेबांनी सोलापूर कलेक्टरची मदत मागितली. ऑक्टोबर ५-१-१९४८ रोजी विलिनीकरणास राजेसाहेबानी संमती दाखवली.[६८]

५ व ६ जानेवारी १९४२ रोजी रिजनल कौन्सिलची बैठक घेण्यात येऊन रिजनल कौन्सिलचे अध्यक्षपद रत्नाप्पा कुंभार यांनी स्वीकारावे अशी विनंती करणारा ठराव पास झाला. परंतु अक्कलकोटच्या लढ्याच्या परिस्थितीमुळे रत्नाप्पा कुंभार या बैठकीस हजर राहू शकले नाहीत. दक्षिण संस्थानात चालू असलेल्या व चालू होणा-या अक्कलकोट, जत, सावंतवाडी, मुधोळ, जंजिरा वगैरे ठिकाणी लढ्यास योग्य ते मार्गदर्शन करणेसाठी व सर्व दक्षिण संस्थानाचे

विलिनीकरणाचीपूर्तता करण्यासाठी खालील कृती समिती करण्यात आली. त्याचे सदस्य पुढीलप्रमाणे ----

१) रत्नाप्पा कुंभार - कोल्हापूर २) डॉ.देशपांडे - सांगली.
३) शंकरराव माने - कोल्हापूर ४) रा.तु.बगाडे - कोल्हापूर.
५) गानू - कुरुंदवाड व ६) ज.बा.पाटणकर - निमंत्रक म्हणून या समितीचे कार्य करतील असे ठरले.[६९]

१९४२ च्या लढ्यातील श्री रत्नाप्पा कुंभार हे निष्णात क्रांतिवीर व जबरदस्त संघटक होते. त्यामुळेच विलिनीकरणाच्या चळवळीतही रत्नाप्पा कुंभार यांनी तितकीच गती दिलेली आढळते. परंतु रत्नाप्पाचा गट हा व्यापारी भांडवलदार व कारखानदार वर्गाचा प्रतिनिधित्व करणारा गट म्हणून बागल गट त्यांचेकडे पहात होता. तर स्वत: भाई बागल आपला गट सर्वसामान्याचा प्रतिनिधित्व करणारा गट आहे अशा प्रकारचे वातावरण निर्मिती करुन पहात होते. परंतु अशा प्रकारच्या टीकांचा विचार रत्नाप्पा कुंभार यांनी कधीच केला नाही. त्यांचे मते अशा टीकांकडे लक्ष द्यावयाचे म्हटले तर हाती घेतलेले काम पहाण्याला वेळ व शक्ती राहाणार नाही.

संस्थानच्या विलिनीकरणाचा प्रश्न अत्यंत जोमाने चालू असल्याने दक्षिण संस्थान संघराज्यातील संस्थानिकांनी प्रजेच्या इच्छेप्रमाणे विलिनीकरणास मान्यता दिली. अक्कलकोटच्या संस्थानी प्रजेच्या व संस्थानिकाच्या विनंती प्रमाणे हिंद सरकारने अक्कलकोट संस्थानवर ताबा घेतला.

विलिनीकरण विषयावर विचारविनिमय करण्यासाठी दक्षिण संस्थान रिजनल कौन्सिलचे अध्यक्ष रत्नाप्पा कुंभार याना आमंत्रित केले. संस्थानच्या विलिनीकरणाच्या प्रकाराला खूप वेग आला होता. कोल्हापूर संस्थानचे विलिनीकरण करावे अशा आशयाचे ठराव करवीर, राधानगरी, शिरोळ, हातकणंगले, इचलकरंजी इ. ठिकाणच्या तालुका सभांनी पास केले. तसेच संस्थानचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रत्येक तालुका सभेने जाहिर सभा घेऊन लोकमत जागृत करण्यास सुरुवात केली. यावेळी झालेल्या चर्चेच्या समारोप करताना रत्नाप्पा

कुंभार म्हणाले की देशातील परिस्थिती झपाट्याने बदलत आहे व या बदलत्या परिस्थितीत संस्थानातून राजेशाही आणि लोकशाही एकत्र नांदणे शक्य नाही. लोकशाहीच्या वाढीसाठी राजेशाही ही नष्ट झालीच पाहिजे. विलिनीकरणाच्या दृष्टीने ही तात्विक भूमिका आहे. संस्थानात मिळालेले जबाबदार राज्यपध्दतीचे अपुरे अधिकारात आणि संस्थानच्या थोड्या उत्पन्नात जनतेच्या हिताचा राज्यकारभार चालविणे अशक्य आहे. संघराज्य स्थापन झाले, परंतु जनतेच्या विरोधामुळे त्याला विलिनीकरणाचा ठराव पास करावा लागला. इतर संस्थानाचेही विलिनीकरण होत चालले आहे अशा परिस्थितीत कोल्हापूरचे स्वतंत्र अस्तित्व राहाणे अशक्य आहे . यामध्ये काही स्वार्थी पुढाऱ्यांचा विरोध होईल. परंतु बदलत्या परिस्थितीत कोल्हापूर संस्थान अवघ्या सहा महिन्याच्या आतच विलिन होईल.[७०]

विलिनीकरणाची चळवळ वेगाने सुरु झालेली होती. जत,संस्थानातील विलिनीकरणाचा लढा रत्नाप्पा कुंभार यांच्या नेतृत्वाखाली सुरु झाला होता. विलिनीकरणाबाबत निर्णय घेण्यासाठी राजेसाहेबांना ३ दिवसांची मुदत दिलेली होती. १६ जानेवारी १९४८ पर्यन्त जर योग्य निर्णय लागला नाही तर जत संस्थानास विलिनीकरणाचा लढा सुरु करण्याचा इशारा देण्यात आला होता. त्यासाठी स्वयंसेवकांचे शिबिरही उघडण्यात येणार होते. इतकेच नव्हे तर रत्नाप्पा कुंभार यांनी जाहिर सभेत भाषण करताना सांगितले की, "अवघ्या दहा, दिवसात आम्ही जत चा संग्राम संपवून यशस्वी होवू " त्यादृष्टीने अक्कलकोटच्या पाठोपाठ दुसरी आघाडी जत संस्थानात उघडली जाणार होती. परंतु अक्कलकोट येथिल लढ्याचा धडा घेऊन जतच्या राजेसाहेबांनी तारीख १७-१-१९४८ रोजी विलिनीकरणास संमती दर्शविली.[७१] व तसे संस्थान खात्याचे प्रादेशिक कमिशनर याना कळविले. याप्रमाणे दक्षिणी संस्थानचे रिजनल कौन्सिलचे अध्यक्ष रत्नाप्पा कुंभार हे जत प्रजापरिषदेच्या विलिनीकरणाच्या चळवळीस मार्गदर्शन करण्यासाठी गेले. तसेच जत प्रजापरिषदेचे अध्यक्ष खानविलकर यांनाही दरबारने विलिनीकरणाच्या वाटाघाटी साठी आमंत्रित केले. जत संस्थानचा कारभार तावडतोब हिंद सरकारच्या हाती घेण्याच्या दृष्टीने

वाटाघाटी यशस्वी झाल्या. राजेसाहेबांनी घेतलेल्या या विलिनीकरणाच्या निर्णयाला जत संस्थानातील प्रजेचा संपूर्ण पाठिंबा होता. त्यामुळे हिंद सरकारच्या संस्थानी खात्याने जतचा कारभार ताबडतोब आपल्या हाती घ्यावा असा हिंद सरकारला विनंती करणारा ठराव पास करण्यात आला अशा प्रकारे २२ जानेवारी १९४८ रोजी रत्नाप्पा कुंभार सारख्या यशस्वी नेत्यांच्या नेतृत्वा खाली जत संस्थानचे विलिनीकरण यशस्वीपणे पार पडले.[७२]

लोक जागृती करण्याच्या दृष्टीने दक्षिण संस्थान रिजनल कौन्सिलचे अध्यक्ष रत्नाप्पा कुंभार यांनी ठिकठिकाणी जाहिर सभा घेण्यास सुरुवात केली होती. सावंतवाडी येथील जाहिर व्याख्यानात श्री रत्नाप्पा कुंभार म्हणाले की " संपूर्ण हिंदुस्थानात असलेले ५६५ संस्थाने हिंदी राज्यात पूर्ण विलिन झाल्याशिवाय हिंदुस्थान ख-या अर्थाने स्वतंत्र झाला असे म्हणता येणार नाही. १५ ऑगस्ट १९४७ ला ब्रिटिशानी स्वतंत्र जाहिर केले असले तरी ख-या अर्थाने हिंदुस्थान अद्याप स्वतंत्र झालेला नाही. अद्याप संस्थानातील प्रजा गुलामगिरीतच आहे ही सारी संस्थाने भारतात विलिन झाल्याशिवाय स्वातंत्र्यात राहिलेली उणीव दूर होणार नाही. देशाचा काही भाग स्वतंत्र व काही भाग परतंत्र राहू शकणार नाही. सा-या देशाचे एक जिनसी स्वातंत्र्य प्रस्थापित करण्या-साठी सारी संस्थाने भारतात विलिन झाली पाहिजेत.[७३]

३० जानेवारी १९४८ रोजी संध्याकाळी दिल्लीतील बिर्ला भवनात रोजच्याप्रमाणे प्रार्थना सभेसाठी गेलेल्या महात्मा गांधीचा नथुराम विनायक गोडसे या हिंदु महासभेच्या कार्यकर्त्याने गोळ्या घालून खून केला. महात्माजींचा खुनी महाराष्ट्रातील असल्याचे प्रथम सांगण्यात आले. महाराष्ट्रातून येणा-या प्रत्येकालाच ' मराठा ' म्हणण्याची उत्तर भारतात प्रथा असल्याने गांधीजींचा खुनी एक ' मराठा ' असल्याचेही वृत्त देण्यात आले. पण खुनी इसम मराठा जातीचा नसून तो ब्राह्मण जातीत जन्मलेला आहे ही बातमी कळताच बाबुराव जेधे, अमृतराव ढेरे वगैरेनी पत्रक काढून खुलासा केला ' महात्मा गांधीचा घातकी हा मराठा नाही, नथुराम विनायक गोडसे हा मराठा नसून तो महाराष्ट्रातील ब्राह्मण जातीचा आहे.'[७४]

गांधीजींच्या खुनामुळे प्रक्षुब्ध झालेल्या लोकांनी महाराष्ट्रातील निरनिराळ्या शहरात तसेच खेड्यापाड्यांतही ब्राह्मणांची घरे जाळली. हिंदु - महासभेचे तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्य महाराष्ट्रात करणाऱ्यामध्ये ब्राह्मणांचा मोठा भरणा होता. त्याच प्रमाणे या संघटनांशी संबंध असल्याच्या संशयावरूनही काही ब्राह्मणेत्तरांवर हल्ले करण्यात आले आणि त्याची घरे व दुकाने जाळण्यात आली. काही कॉंग्रेस कार्यकर्त्यांनाही ते केवळ ब्राह्मण जातीत जन्मले असल्यामुळे जाळपोळीची झळ सोसावी लागली.

३० जानेवारीला गांधीजींना बिंदू चौकात श्रध्दांजली वहाण्यात आली. अनुचित प्रकार न करण्याचा उपदेश भाई माधवराव बागल यानी जनतेला दिला. ३१ जानेवारीस शहरात संपूर्ण हरताळ पाळण्यात आला तेव्हा त्या दिवशी सकाळी नऊ वाजल्यापासून जाळपोळीस सुरुवात झाली. त्या दिवशी छत्रपती देवासला होते, आण्णासाहेब लठ्ठे दिल्लीत होते तर पंतप्रधान पुर्वे पुण्यात होते. रत्नाप्पा कुंभार ही कोल्हापूरात नव्हते ते १ फेब्रुवारीस कोल्हापूरला आले. यावेळपर्यंन्त बरीच जाळपोळ झालेली होती. बागल व मंत्रिमंडळातील सदस्यांनी शहरात पिनरून शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. त्या दिवशी पंचगंगा तीरावर लोकांची सभा घेऊन गांधीजींच्या अहिंसा तत्वानुसार शांत राहाण्याचे आवाहन भाई माधवराव बागलांनी केले. परंतु ही आवाहने कुचकामी ठरली. संतप्त जमावाला त्यांच्यापैकी कोणीही रोखू शकले नाही. मंत्र्यांच्या उपस्थितीत दुकानांना आगी लावल्या जात होत्या आणि ते हे सारे प्रकार पहात होते. बागल व मंत्री शांतता निर्माण करण्याचा प्रयत्न करीत होते, त्यांचा दंगल करणे याला जसा विरोध होता तसाच पोलिसांच्या गोळीबाराला विरोध होता. मंत्र्यांच्या या निष्क्रियतेमुळे या प्रकारांना त्यांचीच आतून फूस आहे अशी दंगलीत ज्यांचे नुकसान झाले त्यांची समजूत होणे साहजिक होते.

कोल्हापूर प्रमाणेच सांगली, कुरुंदवाड, भोर, मिरज, रामदुर्ग, इ. संस्थानातील ब्राह्मण वर्गाचे बऱ्याच प्रमाणात नुकसान गुंडाकडून घडून आले. मालमत्तेची लूट झाली. जबाबदार राज्यपध्दती चालू असलेल्या संस्थानातून कायद्याची व्यवस्था कोलमडून पडली. मंत्र्यांच्या हाती कारभार असल्याने संस्थानिक काही करू शकले

नाहीत. मंत्री दुर्बल ठरले आणि त्याचा परिणाम ब्राह्मण प्रजेला भोगावा लागला. कोल्हापूरातील छत्रपती व मंत्रिमंडळ यांना कोल्हापूर विलिन होण्याचा धोका तत्कालिन परिस्थितीत नव्हता तरीही कोल्हापूरातील दंगा आटोक्यात आणण्यास त्याना यश प्राप्त होऊ शकले नाही. उलट दंगल थांबवण्यास बागल मंत्रीमंडळ अयशस्वी ठरले अशा प्रकारचा आरोप करण्यात आला.

पुढे सावंतवाडी संस्थान प्रजापरिषदेचे तिसरे अधिवेशन १४-२-१९४८ रोजी दक्षिण संस्थान प्रादेशिक मंडळाचे अध्यक्ष रत्नाप्पा कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली यशस्वीपणे पार पडले.[७५] रत्नाप्पा कुंभार आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले" आपणास स्वातंत्र्य मिळाले असले तरी आम्ही ख-या अर्थाने स्वतंत्र झालो नाही. स्वातंत्र्य हे साधन आहे. महात्माजींच्या इच्छे प्रमाणे पं.नेहरुंच्या आदेशाप्रमाणे आमचा देश अद्याप स्वतंत्र झालेला नाही. सर्वांना अंगभर वस्त्र व पोटभर अन्न मिळाले पाहिजे. कोणावर अन्याय होता कामा नये, कोणाचीही कोणाकडूनही पिळवणूक होता कामा नये असे स्वराज्य आम्हाला निर्माण करावयाचे आहे. या स्वराज्याला कोणी रामराज्य म्हणत असतील किंवा कोणी समाज सत्तावादी राज्य म्हणत असतील असे स्वराज्य निर्माण करण्याच्या मार्गातील ब्रिटिश साम्राज्य शाहीचा अडथळा दूर झाला असून एकजिनसी भारत निर्माण करण्याच्या मार्गातील दुसरा अडथळा संस्थानाचा आहे. हिंदूस्थानातील ५६५ संस्थानाना ब्रिटिशानी सार्वभौमत्व दिल्याने त्यामध्ये जातीयवाद फोफावलेला आहे. लोकशाही प्रधान हिंदूस्थानात राजेशाहीला स्थान नाही कारण राजेशाही व लोकशाही एकत्र नांदू शकत नाही. राजेशाही नष्ट करणे हे संस्थानी जनतेचे ध्येय आहे. विलिनीकरण हे संस्थानी प्रजेचे ध्येय आहे."

सावंतवाडी संस्थानाधिपतींनी प्रजेची मागणी लक्षात न घेतल्याने प्रजापरिषदेने तारीख २३-५-१९४८ रोजी प्रतिसरकारची स्थापना करून सावंतवाडीतील अधिका-यांना एक दिवस कुडाळला कैदेत नेऊन ठेवले व संस्थानातील दंगल माजली म्हणून संस्थानाधिपतींनी बेळगांव जिल्हाधिका-यांची

मदत मागितली. या संस्थानाधिपतींनी सरदार वल्लभभाई पटेलांना सावंतवाडी संस्थानाच्या विलिनीकरणास मान्यता असल्याचे कळवले त्याप्रमाणे २९-२-१९४८ रोजी सावंतवाडीच्या राजेसाहेबांनी विलिनीकरणाच्या करारनाम्यावर सही केली.[७६]

जंजिरा संस्थानात देखिल सत्याग्रहास सुरुवात झाली होती. या सत्याग्रहाचे रुपांतर पुढे प्रतिसरकार स्थापन होण्यात झाले. त्यामुळे संस्थानातील कारभार स्थगित झाला व मुंबई प्रांताच्या पोलिसांनी जंजिरा संस्थानात प्रवेश केला व अशा परिस्थितीत जंजि-याच्या नबाबांनी विलिनीकरणास मान्यता दिली व ४-३-१९४८ रोजी जंजिरा संस्थानचा ताबा मुंबई प्रांताने घेतला.[७७]

८-३-१९४८ रोजी दक्षिण संस्थाना पैकी कोल्हापूर व्यतिरिक्त इतर सर्व संस्थाने मुंबई प्रांतात अधिकृतरित्या सामिल झाली. कोल्हापूर विलिनी - करणाच्या सार्वमताबद्दल मतभिन्नता निर्माण झाली. कोल्हापूरच्या छत्रपतींचे त्यावेळचे राजकीय सल्लागार व पहिल्या कॉंग्रेस मंत्री मंडळातील अर्थमंत्री आण्णासाहेब लठ्ठे यांनी विलिनीकरणासंबंधिचे महत्वाचे उद्गार जानेवारी १९४८ मध्ये काढले ते पुढीलप्रमाणे ---

" हिंदी संघराज्याचा कोल्हापूर हा पुरेसा मोठा घटक असल्याने तो स्वतंत्रपणे राहू शकतो. कोल्हापूरच्या गादीबद्दल जनतेत विशेष प्रेम व जिव्हाळा असल्यामुळे येथे सार्वमत घेतले गेल्यास ते विलिनीकरणाच्या बाजूने पडणार नाही. भाषावार प्रांत रचनेच्या वेळीही कोल्हापूरवर विशेष परिणाम होणार नाही. याचे कारण कोल्हापूरची बहुतेक सर्व जनता मराठी भाषिक आहे. "

कोल्हापूरच्या सार्वमताबद्दल लठ्ठे यांनी दिलेला दिलासा रत्नाप्पा कुंभार यांना मुळीच मान्य नव्हता ते म्हणाले --

" सर्वच संस्थाने विलिन व्हावयास पाहिजेत. कोल्हापूरसुध्दा विलिन होणे जरूर आहे पण अशी भाषा निघाल्यास,कोल्हापूरात जातीय दंगल होईल असे बागल बंधू म्हणतात. जातीय दंगलीची कल्पना,तसा लढा करणा-यांच्या डोक्यातून निघाली आहे प्रजेला विलिनीकरणच पाहिजे आहे" रत्नाप्पा कुंभारांनी अखिल भारतीय संस्थानी प्रजेच्या सरचिटणीसाना गांधी जुना नंतरच्या कोल्हापूर

संस्थानातील दंगली बद्दल एक गोपनीय अहवाल पाठवला होता. या २२ टंकलिखित पानाच्या आहवालाच्या अखेरीस रत्नाप्पाण्णांनी निष्कर्ष काढला होता " कायदा व सुव्यवस्था राखण्यास बागल मंत्रिमंडळ संपूर्णपणे असमर्थ ठरले आहे. मंत्रिमंडळाच्या काही सदस्यांनी गुप्तपणे काही अनिष्ट कृत्यांना पाठींबा दिला असल्याचे किंवा त्याच्याकडे जाणून बुजून दुर्लक्ष केले जात असल्याचे आरोप केले आहेत. "

श्री रत्नाप्पा कुंभारांनी यावर काही उपायही सुचवले होते. छत्रपतींनी बागल मंत्रिमंडळ बडतर्फ करावे, जातिनिरपेक्ष असलेले नवे हंगामी मंत्रिमंडळ नेमावे, झालेल्या प्रकारांची न्यायालयीन चौकशी केली जावी, दंगलीत ज्याचे नुकसान झाले त्यांना साह्य द्यावे, तालीम संघावर बंदी घालावी अशा सूचना त्यांनी केल्या होत्या. [७८]

रत्नाप्पा कुंभारांनी प्रजापरिषदेच्या मध्यवर्ती सभेची बैठक मार्च ७, १९४८ रोजी घेतली. या बैठकीस १४७ पैकी ८२ सभासद हजर होते हे सभासद रत्नाप्पा कुंभारांचे १९४२ च्या चळवळीतील सहकारी होते. या सभेत भाई माधवराव बागल व कार्यकारी मंडळ यांच्यावर अविश्वासाचा ठराव विन विरोध पास झाला व तात्पुरते कार्याध्यक्ष पदासाठी रत्नाप्पा कुंभारांची नियुक्ती झाली. या सभेत शंकरराव माने यांनी " कोल्हापूर संस्थान हे विलिन झाले पाहिजे व विलिनीकरणाला छत्रपतींनी मान्यता द्यावी " अशी विनंती करणारा ठराव मांडला व हा ठराव एकमताने पास झाला. [७९]

कोल्हापूर प्रजापरिषदेची विलिनीकरणाची भूमिका स्पष्ट करण्याकरता पन्हाळ्यास अधिवेशन घेतले. अधिवेशन शंकरराव मोरे यांच्या अध्यक्षतेखाली ९-३-१९४८ रोजी पार पडले. [८०] या अधिवेशनात झालेला ठराव कॉंग्रेसच्या बड्या नेत्यांना आवडणारा नव्हता या अधिवेशनात भाई बागलांच्या वरील अविश्वासाचा व विलिनीकरणास विरोध करणारा असे दोन ठराव पास झाले. वास्तविक ही बैठक ७ मार्च रोजी घेण्याबद्दल अखिल भारतीय संस्थानी प्रजा - परिषदेचे सरचिटणीस गोकुळ भाई भट्ट यांचेकडे भाई माधवराव बागलांनी मान्य

केली होती पण त्याच वेळी महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेसची मुंबईस बैठक होणार असल्याने व बागलांना निमंत्रण असल्याने मध्यवर्ती मंडळाची सभा दोन दिवस पुढे ढकलली पण रत्नाप्पा कुंभारांनी आधी ठरल्याप्रमाणे व वर उल्लेखल्याप्रमाणे त्यांच्या गटातर्फे मध्यवर्ती सभेची ७ मार्च ला बैठक घेतली अशाप्रकारे पन्हाळा अधिवेशनापासून प्रजापरिषदेत दोन गट पडले एक विलिनीकरणवादी व दुसरा विलिनिकरण विरोधी. रत्नाप्पा कुंभारांनी संस्थान भर पिंगरुन विलिनी - करणाचा प्रचार केला.

९ मार्च च्या पन्हाळ्याच्या बैठकीत बोलताना माधवराव बागलांनी रत्नाप्पा कुंभारांना विलिनीकरणवादी गटावर हल्ला चढवला, शेतकरी, मजूर राज्य स्थापन करण्यासाठी स्वतंत्र घटक म्हणून कोल्हापूर वेगळे राहिले पाहिजे या विचाराचा पुनरुच्चार करुन भाई माधवराव बागलांनी दावा केला की " हिंदुस्थानातील कोणत्याही मंत्रिमंडळाला इतकी चांगली कार्ये करता आली नाहीत ती आमच्या मंत्रिमंडळाने तीन चार महिन्यात करुन दाखविली आहेत. "

पन्हाळ्याला भरलेल्या मध्यवर्ती मंडळाच्या बैठकीत १५३ सभासदांपैकी ८४ सभासद हजर होते. मध्यवर्ती मंडळातील बहुमत हे भाई माधवराव बागल यांच्या मागे असल्याचे दिसून आले. बहुमताच्या जोरावर १० मार्च १९४८ रोजी पन्हाळ्यास भरलेल्या प्रजापरिषदेच्या खास अधिवेशनाने कार्याध्यक्ष माधवरावांवर आपला पूर्ण विश्वास असल्याचा ठराव मंजूर केला. प्रजापरिषदेच्या एकूण ११५२ प्रतिनिधि पैकी ७५४ प्रतिनिधि या अधिवेशनास हजर होते.[८१]

प्रजापरिषदेच्या घटनेप्रमाणे कार्याध्यक्षास काढण्याचा आणि त्यांच्या जागी नवा कार्याध्यक्ष निवडण्याचा अधिकार फक्त प्रजापरिषदेच्या अधिवेशनातच घेता येत असे त्यामुळे सात मार्च ला रत्नाप्पाकुंभार यांची कार्याध्यक्ष म्हणून झालेली निवड घटनाबाह्य व बेकायदेशीर असल्याचे बागल गटाचे म्हणणे होते. बागल गटाच्या नियंत्रणाखाली असलेल्या प्रजापरिषदेच्या कार्यकारिणीने १७ मार्च १९४८ रोजी एक ठराव मंजूर करुन रत्नाप्पा कुंभार, म.दु.श्रेष्ठी, रा.दु.बगाडे, गोपाळ बकरे, शंकरराव माने वगैरे तेरा जणांचे सभासदत्व तीन वर्षासाठी रद्द केले.[८२]

हिंद सरकारच्या संस्थानी खात्याचे चिटणीस व्ही.पी.मेनन १८ मार्च ला कोल्हापूरला आले. रत्नाप्पा कुंभार आणि त्यांच्या गटातील निवडक लोकांनी मेनन यांची भेट घेतली. त्यावेळी व्ही.पी.मेनन नी सांगितले " महात्मा गांधी यांच्या वधा नंतर कोल्हापूरात जी परिस्थिती निर्माण झाली त्याची पहाणी करण्यासाठी मला सरदार वल्लभभाई पटेल यांनी मुद्दाम पाठविलेले आहे. तेथे घडलेल्या प्रकारांची स्वतंत्र चौकशी करण्यात येईल. ही चौकशी नि:पक्ष व्हावी म्हणून हल्लीचे मंत्रीमंडळ बरखास्त करण्यात येईल. हिंद सरकार तर्फे एका ॲडमिनिस्ट्रेटरची नेमणूक होईल. घटना समितीच्या निवडणूकी पर्यन्त ॲडमिनिस्ट्रेटर राज्यकारभार पाहिल या योजनेला छत्रपती महाराजांनी संम्मती दिली असून एक दोन दिवसात हिंद सरकारतर्फे राज्यकारभार हाती घेतला जाईल. " ८३

व्ही.पी.मेनन यांनी सर्व चौकशी करून बागल मंत्रीमंडळ बरखास्त करण्यात येईल आणि प्रशासक नेमला जाईल असे जाहिर केले. या निर्णयाविरुध्द प्रजापरिषदेचे कार्याध्यक्ष भाई माधवराव बागल यांनी पं.नेहरु,सरदार पटेल आदि कॉंग्रेस श्रेष्ठींना निषेधाच्या तारा पाठवून सरकारचा वरील निर्णय हा लोकशाही विरोधी आणि बेकायदशीर असल्याचे कळविले.

याबद्दल काढलेल्या ता.१९-३-१९४८ च्या पत्रकात ते म्हणतात " मंत्री वाईट निघाले तर त्यांना काढून टाकण्याचा अधिकार प्रजेला आहे हा अधिकार जर कोणी काढून घेतला तर प्रतिकार करु,कोल्हापूर मुंबई प्रांतात सामील होता कामा नये. हिंद राज्याचा ते स्वतंत्र घटक राहिल व तसा तो ठेवण्याचा आमचा अढळ निश्चय आहे. " ८४

भाई माधवराव बागलानी केलेल्या आकांडतांडवाचा सरदार वल्लभभाई पटेल,व्ही.पी.मेनन वगैरेवर काहीही परिणाम झाला नाही. वसंतराव बागलाचे मंत्रिमंडळ बरखास्त करण्यात आले आणि हिंद सरकारने नाशिकचे जिल्हाधिकारी कॅप्टन व्यंकटसुब्रमण्यम नंजाप्पा यांची कोल्हापूरचे प्रशासक म्हणून नेमणूक केली. श्रीमंत छ.महाराज यांच्या वतीने पूर्वीप्रमाणे प्रधानपद राव ब.सुर्वे यांनी पहावयाचे होते. राखीव खात्यांचा कारभार प्रधान सुर्वेकडे होता. पूर्वी मंत्रीमंडळाकडे असणारी सर्व सोपीव खाती ॲडमिनिस्ट्रेटरकडे सोपविण्यात आली.

प्रत्यक्षात महत्वाचे निर्णय ॲडमिनिस्ट्रेटर नंजाप्पा घेत होते. कॅ.नंजाप्पानी ता. १२-३-१९४८ रोजी कोल्हापूरात आल्यानंतर त्याच दिवशी अधिकार हाती घेतला. माधवराव बागल यांच्या आदेशानुसार शहरात हरताळ पाळण्यात आला.[६५]

कोल्हापूर येथे नेमलेल्या प्रशासकाच्या नेमणुकीबाबत छत्रपतींचे राजकीय सल्लागार लठ्ठे म्हणतात गांधीवधानंतरच्या परिस्थितीचा बागल मंत्रिमंडळाने गैर रीतीने फायदा करुन घेतला. या मंत्रीमंडळाविरुध्द बऱ्याच तक्रारी होत्या म्हणून महाराजांनी आपण होऊन काही करावे अशी सरकारची इच्छा होती त्यादृष्टीने महाराजांनी पावले टाकताच परिपादेने महाराजांना सत्तेचा लोभ सुटत नाही व दंगल परिस्थितीचा फायदा घेऊन हे मंत्रीमंडळ बरखास्त करीत आहेत अशी ओरड सुरु केली म्हणून महाराजांनी हा आरोप टाळण्यासाठी सर्व गोष्टी सरकारकडे सोपविल्या व त्यामुळे प्रशासक आला.

रत्नाप्पा कुंभार यांनी विलिनीकरणाबाबत जागृती करण्यासाठी कोडोली, बोरपाडळे, देवाळे, कापशी, भेडसगांव, सरुड या ठिकाणी जाहिर सभा घेऊन जनजागृती करण्यास सुरुवात केली.[६६]

कोल्हापूरातील सत्यस्थिती दिल्लीतील केन्द्रिय मंत्र्यांच्या कानी घालण्यासाठी माधवराव बागलांच्या नेतृत्वाखाली एक शिष्ट मंडळ नेमण्यात आले त्यामध्ये दॉ.खर्डेकर,बळवंत बराले इ.चा समावेश होता. परंतु भेटीतून काहीही फायदा झाला नाही.कॅ.नंजाप्पानी कोल्हापूरचा कारभार हाती घेतल्या बरोबर कोल्हापूरचे अप्रत्यक्ष विलिनीकरणच झाले होते कारण अधिकारसूत्रे हाती घेतल्यापासून अवघ्या पंधरवड्यात कॅ.नंजाप्पानी ३६० जणांना अटक केली, त्यामध्ये दोन भूतपूर्व दोन मंत्री डी.एस.खांडेकर व नारायणराव सरनाईक होते.तसेच भाई बागलानाही सुरक्षा कायद्याखाली दोन महिने बंदिवासात टाकण्यात आले.[६७]

भाई माधवराव बागलाना जुलै १९४८ मध्ये बंधमुक्त करण्यात आल्यानंतर बागलानी वल्लभभाईना भेटण्याचे ठरविले परंतु काहीही उपयोग होणार नाही असे कॅ.नंजाप्पानी त्याना सांगितले त्यानी आपला निश्चय बाजूला ठेवला आणि नंजाप्पाच्या अत्याचारी कारभाराबद्दल तक्रार करणारे पत्र महाराष्ट्र कॉंग्रेस तसेच वल्लभभाई पटेल याना पाठवले.[६८]

मंत्रीमंडळाच्या कृत्याची चौकशी करण्यासाठी न्या.कोयाजी यांचे कमिशन नेमण्यात आले. या कोयाजी कमिशनची नेमणूक ५ जून १९४८ रोजी झालेली होती. या कोयाजी कमिशनचे काम ता.१७-६-४८ ते ७-९-१९४८ पर्यन्त गुप्त रीतीने चालले. या कमिशनने सात मंत्र्यांपैकी दरबार नियुक्त तीन मंत्री श्री सर्जेराव माने, बॅ.माने, जाधव यांना दोषमुक्त केले परंतु प्रजापरिषद नियुक्त माधवराव बागल, बसंतराव बागल, नारायणराव सरनाईक, कारखानीस, खांडेकर या मंत्र्यानी दंगलीला प्रोत्साहन देऊन गुंडाच्या गुन्ह्याकडे हेतुपुरस्सर कानाडोळा केला असा आरोप केला व दोषी ठरविले.

कोल्हापूर शहराच्या हद्दीबाहेर संस्थानात अन्यत्र झालेल्या बहुतेक घटना रत्नाप्पा कुंभारांच्या गटातील त्यांच्या पाठीराख्यानी केल्या असे कोयाजी आयोगाला सांगण्यात आले होते पण हा आरोप सिध्द करण्यासाठी असा कसलाच पुरावा मिळाला नसल्याचे न्यायमूर्ती कोयाजीनी अहवालात म्हटले होते.

गांधीजींच्या खुनानंतरच्या कोल्हापूरातील जाळपोळीच्या प्रकारामुळे कोल्हापूर संस्थानाचे वेगळे अस्तित्व राहू न देता ते मुंबई प्रांतात विलिन करावे असे दिल्लीतील सरदार वल्लभभाई पटेलां सारख्या कॉंग्रेस नेत्यांना तीव्रतेने वाटू लागले.

कोल्हापूरातील जाळपोळीचे प्रमाण सांगली मिरजेच्या मानाने कमी झाले पण दिल्लीपर्यन्त ओरड मात्र कोल्हापूरबाबत केली जात असल्याबद्दल माधवराव बागलानी जाहिर तक्रार केली.[८१]

भाई माधवराव बागल हे म्हणतात सार्वमताशिवाय विलिनीकरण होता कामा नये पण त्याना स्वत: याबाबतीत लढा देण्याची हिंमत राहिली नव्हती व रत्नाप्पा कुंभारासारखा कुशल संघटक ही त्यांच्या पाठीशी नव्हता.

ऑगस्टच्या १९४८ च्या दुसऱ्या आठवड्यात मुंबईच्या गव्हर्नर साहेबांनी कोल्हापूरला भेट दिली आणि आज ना उद्या कोल्हापूर संस्थान मुंबई प्रांतात विलिन करावेच लागेल असे त्यानी छत्रपती शहाजी महाराजांना सांगितले, तेव्हा

तशीच वेळ आली तर आपण राज्यत्याग करू किंवा महाराणीसाहेबांची रीजंट म्हणून नेमणूक करू पण स्वखुशीने विलिनीकरणाच्या करारावर सही करणार नाही असे छत्रपतींनी उत्तर दिले. गव्हर्नरसाहेबांनी कोल्हापूराहून प्रयाण केल्यानंतर छ.शहाजी महाराजांनी माधवराव बागलाशी गुप्त वाटाघाटी केल्या, तेव्हा माधवरावांनी विलिनीकरणास विरोध करण्यासाठी छत्रपतींना सहाय्य करण्याचे कबूल केले. छ.शहाजी महाराज व पंतप्रधान रुठे यांच्या विरोधी अनेक पत्रे लिहून नंजाप्पा दिल्लीतील सत्ताधिशांचे मन विरोधी करण्याचा प्रयत्न करीत होते. मुंबईचे गव्हर्नर कोल्हापूरला येऊन गेल्यानंतर छ.शहाजी महाराज देवासला गेले. तेव्हा छ.शहाजी महाराज देवासला आठवडे न आठवडे राहून मध्यभारतातील संस्थानिकांबरोबर खलबते करतात आणि कारस्थाने करतात असे नंजाप्पाना वाटत असे म्हणून कोल्हापूर संस्थानचे विलिनीकरण तातडतोब घडवून आणावे असा त्यांनी वरिष्ठांकडे आग्रह धरला होता तसेच कोल्हापूरातील विलिनीकरणास विरोध करणारी मंडळी निपचीप असल्याने कोल्हापूरचे विलिनीकरण १९४८ च्या सप्टेंबर संपण्यापूर्वी झालेच पाहिजे असा आग्रह रत्नाप्पा कुंभार सरदारवल्लभभाई पटेलांना करीत होते हे पुढील पत्रावरून दिसते.

Ratnappa Kumbhar
Kolhapur
Camp Bombay
26 August, 1948.

My Dear Sardar Sahib,

I am writing to you after a fairly long time because I did not want to trouble you during the period of your convalescence. I am glad that you have fully recouped your health and are again at your post in the service of our country. May God give you good health and long life.

2. The main object of writing this letter is to show to you that the time to take decisive step and merge the state

has now come. Just now, all the opposition forces are most demoralized and at their lowest ebb. The Maharaja is frightened because the Administrator has asked him to refund the huge sum of Rs.65 lakhs or so which the Maharaja has illegally taken from the treasury. The party of Mr.Bagal is also most demoralized because of the enquiry under Justice Goyajee the rabid communal organisation of Messrs. Jedhe and More has not had any time to spread its feet in Kolhapur .The friends of the Maharaja are also trembling in their shoes because they have lost all influence and are feeling that an early mereger is inevitable. The Maharaja himself has become so unpopular with the public at large owing to his vices that merger will be deemed to be a relief by most of the subjects of the State. The most critical time has, therefore, arrived and the State must be merged. If ever, now, The question should under no circumstances, be postponed beyond September. The Governor of Bombay recently paid a visit to Kolhapur when we could meet him and when he could study the situation first hand. I feel that he has also convinced of the extreme desirability, of deciding the merger issue without delay.

3. There is no truth in the statement that riots will break out in Kolhapur. If the state is merged.Such prophecies were made on several occasions in the past, viz.; when the Bagal Ministry was dismissed, Mr.Madhavrao Bagal was arrested.etc. But nothing happened.Now the conditions are so favourable that a reaction is least likely to happen. The situation is well under control as the Administrator will testify. I therefore, feel that there is no point in postponing merger on a panicky forecast of eventualities.

4. I would also like to impress upon you the complications that will arise if the merger issue is postponed. It will not be possible then to delay elections any longer. Once the elections start, all opposition forces which are now demoralized and at the lowest ebb will be strengthened again The Maharaja will spend huge amounts in subsidising all reactionary and communal elements. An attempt will be made to secure a majority for the rabid communalists in the forth coming elections and then to create fresh difficulties with their support. The politics of Bahujan Samajvad of Jedhe and more will be introduced in Kolhapur and fully devéloped on the election platform. I am afraid that these and numerous other complications will arise if a decision on the merger is postponed and elections are held ( as they inevitably must be ) these complications must be avoided at any cost.

5. I have seen Sjt Balasaheb Kher and discussed the situation with him in detail. I would, therefore, request you to kindly discuss the situation with sjt. Kher during his next visit to Delhi and take a final decision on the matter.

6. I would also be grateful if you can find some time to see me. I am coming to Delhi on about the 28th inst., and at the time of our interview, I will be able to explain the whole local situation personally. [30]

With best regards,

Yours sincerely,

Ratnappa Kumbhar.

१९४८ च्या नोव्हेंबरच्या सुरुवातीस छ. शहाजी महाराजांनी विलिनी करणास तयार व्हावे यासाठी त्यांच्यावर खूप दडपण आणण्यात आले.

छ. शहाजी महाराजांनी ग्वाल्हेरला जाऊन आपल्या मध्यभारतातील संस्थानिक मित्रांशी सल्लामसलत केली आणि अखेर कोल्हापूर संस्थानच्या विलिनीकरणास त्यानी नाखुषीने मान्यता दिली.

कोल्हापूरच्या विलिनीकरणाबाबत संस्थानी प्रजेकडून संस्थान खात्याकडे सारखी मागणी येत होती आणि या मागणीच्या निर्णयार्थ सार्वमत घेण्याची सूचना केली जात होती, असे सार्वमत घेतल्यास प्रादेशिक वाद निर्माण होईल अशी भिती वाटत होती, महाराजांच्या संमतीने या प्रश्नाचा निकाल करावा असे संस्थान खात्याने ठरविले.

५-१-१९४९ रोजी घटना परिषदेत बोलताना संस्थानी खात्याचे प्रमुख सरदार वल्लभभाई पटेल यानी सांगितले की " ज्या संस्थानात एका गटाकडून मोठ्या प्रमाणावर हिंसक कृत्ये घडून येण्याने सर्वसाधारण जनतेला दहशतवादाची भिती आहे अशा ठिकाणी सार्वमत घेणे सुलभ नाही. "

८ जानेवारी १९४९ रोजी शहाजी छत्रपतींनी दिल्लीत सरदार पटेलांची भेट घेऊन त्यांच्या बरोबर वाटाघाटी केल्या आणि त्याच महिन्याच्या अखेरीस कोल्हापूर संस्थान १ मार्च १९४९ पासून मुंबई प्रांतात विलिन असल्याची संस्थानाबद्दलच्या केन्द्र सरकारच्या खात्याने अधिकृत घोषणा केली. छत्रपतींना सालिना दहा लाख रुपये तनखा आणि एकूण बावन्न हजार शेरी जमिनीपैकी दहा हजार एकर जमीन देण्यात आली.[१२]

रयतेच्या पत्रात रत्नाप्पांनी सरदार वल्लभभाई पटेल यांना कोल्हापूर संस्थानात प्रशासकाची नेमणूक करावी अशी विनंती केली आहे.

Kolhapur
19 January 1949.

My Dear Sardar Sahib,

Kindly allow me to convey to you the heartfelt thanks of the Kolhapur people for brining about the merger of the State. We are all so happy about the event and look forward to a new era of progress and prosperity for the people here. We are eagerly awaiting the official announcement of the merger when we shall take the earliest opportunity to publicly express our sense of gratitude to the Government of India and to yourself in particular .

2. I wish to take your valuable time and place before you two proposals which arise out of the merger :-

(1) In order to smoothen the transition to Kolhapur State from its existing independent position to that of a district in the provience of Bombay, it is essential to continue the post of the Administrator for some time. Even after the merger and to give him sufficient authority to clear out the huge debris of work that has accumulated in every department. This will avoid the inconveniences which have been caused to the people of the other Deccan States in the period immediately following the merger.

(2) Secondly, there are several resources of the State for instance the state Railway, the Shri Shahu Chhatrapati Textile Mills, the Telephone Exchange etc. The value of these assets must be ear-marked for development work in the state which has to be organized on a more or less permanent basis in order to bring Kolhapur on a line with the other districts of the province.

I have addressed detailed letters on these topics to the

State Ministry ( copies enclosed herewith ) Both the matters are very urgent and I would request you to kindly give your most sympathetic consideration to them.

3. I have also one more request to you. The Hon'ble Mr. G.V.Mavalankar has been connected with Kolhapur for a very long time. He knows the people here, the local situation, and our problems. He has also known some of our development schemes at first hand. I would, therefore, be grateful if you would kindly request him to give you his views on these problems. He would be able to explain the whole position in a way in which no official can ever do.[६९]

With best regards,

Yours faithfully,
Ratnappa Kumbhar.

अशा रीतीने कोल्हापूरच्या छत्रपतींनी आपल्या प्रजापरिषदेस डावलून विलिनीकरणास संमती दिली व प्रजेच्या संमतीची वाट न पाहता संस्थान खात्याने कोल्हापूरचे मुंबई प्रांतात विलिनीकरण करण्याचे ठरविले. ता. १ मार्च १९४९ रोजी प्रत्यक्ष विलिनीकरण करण्याचा समारंभ मुंबई प्रांताचे मुख्य मंत्री कै. श्री बाळासाहेब खेर यांच्या अध्यक्षतेखाली झाला. यावेळी बोलताना "छत्रपतींनी विलिनीकरणास संमति दिल्यावर सार्वमत घेण्याची ,आवश्यकता राहिली नाही जनता केव्हाही लोकशाही विरोधी असू शकत नाही आणि मग सार्वमत कां घ्यावयास पाहिजे " अशा गोड शब्दात श्री खेर यांनी सार्वमतवाल्यांची बोळवण केली अशा प्रकारे कोल्हापूरच्या विलिनीकरणाने दक्षिणी संस्थानाचे संपूर्ण विलिनीकरण झाले.[६२]

कोल्हापूरचे कायदे मंडळ जसे विसर्जित करण्यात आले तसेच कोल्हापूर संस्थान प्रजापरिषदेचेही विसर्जन करण्यात आले. आपल्या गटातील कार्यकर्त्यांनी

कॉंग्रेस बाहेर पडून स्वतंत्र राजकीय पक्ष म्हणून कार्य करीत असलेल्या शेतकरी कामगार पक्षात सामील व्हावे असे माधवराव बागलांनी त्यांना आवाहन केले. त्या आधी रत्नाप्पा कुंभारांच्या गटाने कोल्हापूर शहर तसेच जिल्हा कॉंग्रेस काबीज केली होती कारण कॉंग्रेस श्रेष्ठींचा रत्नाप्पा कुंभारांच्या कार्यावर पूर्ण विश्वास होता.

प्रजापरिषदेच्या स्वातंत्र्य चळवळीच्या कार्यात रत्नाप्पांचा सिंहाचा वाटा होता. स्वातंत्र्य सैनिक म्हणून त्यांनी मोलाचे कार्य केले म्हणून लोक त्यांना आज देखील देशभक्त आण्णा याच नावाने संबोधतात. भारत स्वतंत्र झाल्यावर आण्णा जनतेची गरीबी दूर करण्याकडे वळले व सहकारातून विकास करण्याकडे त्यांनी आपले लक्ष केन्द्रित केले.

..

## संदर्भ


१ केसरी - १७ जानेवारी १९३९ - पृ.क्र. २०

२ बाबुराव गोखले - विद्याविलास शतसांवत्सारिक १९८६,पृ.क्र.४७

3 किता ४७

४ किता ४७

५ ग.रं.भिडे- कोल्हापूर दर्शन - पृ.क्र. २९५

६ माधवराव बागल - जीवन प्रवाह - पृ.क्र.१२

७ बाबुराव गोखले - विद्याविलास शतसांवत्सारिक १९८६,पृ.क्र.४८

८ ग.रं.भिडे - कोल्हापूर दर्शन - पृ.क्र. २९५

९ केसरी - १७ जानेवारी १९३९- पृ.क्र. २०

१०.माधवराव बागल - जीवन प्रवाह - पृ.क्र. ३४

११.बाबुराव गोखले - विद्याविलास शतसांवत्सारिक १९८६,पृ.क्र.५१

१२.माधवराव बागल - जीवन प्रवाह - पृ.क्र. ३१

१३.ग.रं.भिडे - कोल्हापूर दर्शन - पृ.क्र. २९५

१४.श्री.हिंदूराव वाझे - नवरत्न-७७,स्मरणिका

१५.महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर - कोल्हापूर डिस्ट्रिक्ट,महाराष्ट्र सरकार,१९६०

१६.लालजी उपाध्ये - करवीर क्रांती- पृ.क्र.१२

१७.केसरी - १७ मार्च १९३८ - पृ.क्र.११

१८.महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर - कोल्हापूर डिस्ट्रिक्ट,महाराष्ट्र सरकार,१९६०

१९.लालजी उपाध्ये - करवीर क्रांती - पृ.क्र.१२

२०. किता १3

२१.बाबुराव गोखले - विद्याविलास शतसांवत्सारिक १९८६,पृ.क्र.५३

२२. किता पृ.क्र.५४

२३.प्रा.दुष्यंत कुंभार - अमृतमहोत्सव - स्मरणिका - १९८४ ८५ पृ.क्र.२६

२४.लालजी उपाध्ये - विद्याविलास - शतसांवत्सारिक - १९८६,पृ.क्र.७२

२५.स.मा.गर्गे - करवीर रियासत - पृ.क्र.६४३

२६ माधवराव बागल - जीवन प्रवाह - पृ.क्र. ५५

२७ जयंत पी.नाईक - कोल्हापूर नगरपालिकेचा इतिहास - पृ.क्र. १८०-८१

२८ लालजी उपाध्ये - करवीर क्रांती - स्मरणिका - पृ.क्र. १३

२९ जयंत पी.नाईक - कोल्हापूर नगरपालिकेचा इतिहास - पृ.क्र. १८०-८१

३० वि.अ.पटवर्धन - दक्षिण महाराष्ट्रातील संस्थानांच्या विलिनीकरणाची कथा - पृ.क्र. २२, २३

३१ विजय जगताप - अमृतमहोत्सव गौरवगाथा -

३२ बाबूराव गोखले - विद्याविलास शतसांवत्सारिक - पृ. ५९

३३ कित्ता ६०, ६१

३४ कित्ता ६३

३५ कित्ता ७४

३६ कित्ता ७४

३७ लालजी उपाध्ये - करवीर क्रांती - १९७२, पृ.क्र. ४२

३८ कित्ता ४२.

३९ बाबूराव गोखले - विद्याविलास शतसांवत्सरिक - १९८६, पृ.क्र. ७५

४० लालजी उपाध्ये - करवीर क्रांती - १९७२, पृ.क्र. २२

४१ कित्ता २३

४२ बाबुराव गोखले - विद्याविलास शतसांवत्सारिक - १९८६, पृ.क्र. ८२

४३ दं. सागर - स्मरणिका - पृ.क्र. २१

४४ बाबुराव गोखले - विद्याविलास शतसांवत्सरिक - १९८६, पृ.क्र. ८४

४५ आ.तो.पाटील - रत्नदर्पण - गौरव ग्रंथ - १९७१, पृ.क्र. ५५

४६ लालजी उपाध्ये - करवीर क्रांती - १९७२ - क्र. १४

४७ प्रा.दष्यंत कुंभार - १९८४ - अमृतमहोत्सव - स्मरणिका - पृ.क्र. २८

४८ सत्यवादी - १४-८-१९४६

४९ पुढारी - १ ऑगस्ट १९४७ पृ.क्र. २

५० सत्यवादी - ९-८-४७ - पृ.क्र. ३

५१ स.मा.गर्गे - करवीर रियासत - पृ.क्र. ६४६

५२ माधवराव बागल - अखंड भारत - १९ जून १९४७

५३ सत्यवादी - २४ ऑक्टोबर १९४७

५४ माधवराव बागल -अखंड भारत - ६ नोव्हेंबर १९४७

५५ य.दी.फडके - आण्णासाहेब लठ्ठे - १९८९- पृ.क्र.२५४

५६ सत्यवादी - १८ नोव्हेंबर १९४७

५७ अखिल भारतीय संस्थानी प्रजापरिषद,फाईल क्र.१०२ भाग-२

५८ दुर्गादास - सरदार पटेल - कॉरेस्पॉन्डन्स खंड-५ - पृ.क्र.४५६-५८

५९ किता २४ नोव्हेंबर १९४७

६० य.दि.फडके - आण्णासाहेब लठ्ठे - १९८९ - पृ.क्र.२५५

६१ किता २५६

६२ पुढारी - ३ डिसेंबर १९४७

६३ ऑल इंडिया स्टेट्स पीपल्स कॉन्फरन्स फाईल क्र.१०२,जे.बी.
पारणकरांचे अ.भा.सं.प्र.परिषदेच्या सर चिटणीसांना पत्र १७ डिसेंबर
१९४७

६४ वि.अ.पटवर्धन - दक्षिण महाराष्ट्रातील संस्थान विलिनीकरणाची
कथा - पृ.क्र.८८

६५ किता ९१

६६ किता ९२

६७ किता पृ.क्र.९३

६८ किता ९४

६९ सत्यवादी - ५ जानेवारी १९४८

७० सत्यवादी - 13 ,, १९४८

७१ वि.अ.पटवर्धन - प.म.सं.वि.कथा - पृ.क्र.९४

७२ सत्यवादी - २२ जानेवारी १९४८

७३ सत्यवादी - ३० ,, १९४८

७४ य.दि.फडके - आण्णासाहेब लठ्ठे - पृ.क्र.२६१

७५ सत्यवादी - १७ जानेवारी १९४८

७६ वि.अ.पटवर्धन - द.म.सं.वि.कथा - पृ.क्र.९७

७७ किता ९७

७८ ऑल इंडिया स्टेटस पीपल्स कॉन्फरन्स फाईल क्र. १०२
श्री रत्नाप्पा कुंभारांनी सरचिटणीसांना पाठवलेला गोपनीय
अहवाल - ६ मार्च १९४८.

७९ सत्यवादी - ८ मार्च १९४८

८० माधवराव बागल - जीवन प्रवाह - पृ.क्र. १४४

८१ ऑल इंडिया स्टेटस पीपल्स कॉन्फरन्स - बळवंत घाडी बराळे यांचे
गोकुळभाई भट्ट यांना पत्र - २९ मार्च १९४८

८२ द. दि. फडके - आण्णासाहेब लठ्ठे - पृ.क्र. २६९

८३ सत्यवादी - १८ मार्च १९४८

८४ वि.अ. पटवर्धन - द.म.सं. वि.लढा - पृ.क्र. १००

८५ सत्यवादी - २२ मार्च १९४८

८६ सत्यवादी - १९ मे, २० मे १९४८

८७ वि.अ. पटवर्धन - द.म.सं. वि.क्र. - पृ.क्र. १०१

८८ दुर्गादास - सरदार पटेल कॉरेस्पॉडन्स खंड - ७ - १९७३ -
माधवराव बागलाचे सरदार पटेलांना पत्र - २६ जुलै १९४८ - पृ.क्र. ५५८
व पृ.क्र. ५५९.

८९ पुढारी - २६ फेब्रुवारी १९४८

९० दुर्गादास - सरदार पटेल कॉरस्पॉडन्स - श्री रत्नाप्पा कुंभाराचे
सरदार पटेलांना पत्र - २६ ऑगस्ट १९४८, पृ.क्र. ५६३-५६५

९१ किता १९ जानेवारी १९४९

९२ पुढारी - २ मार्च १९४८.